हया नमून्याची अनेकदा पुनरावर्ती झाली. इस्त्रायली पाप करत, देव त्यांना शासन करी, ते पश्चाताप करत आणि देव त्यांचे तारण करी. अनेक वर्ष देवाने इस्त्रायल्यांकडे त्यांना शत्रूपासून वाचवण्यिासाठी अनेक तारणारे पाठवलि.



शेवटी लोकांनी अन्य राष्टासारखा राजा देवाकडे मागतिला. त्यांना उंच, सशक्त व युध्दामध्ये नेतृत्व करणारा असा राजा हवा होता. देवाला हे आवडले नाही, तरीही त्याने त्यांच्या मागणी नुसार त्यांना एक राजा दलिा.

# 17. देवाच्या दावदाबरोबर करार



शौले इस्त्रायलचा पहिला राजा होता. लोकांना पाहिजे तसाच तो सुंदर व ऊंच होता. इस्त्रायलावर काही वर्षे शौल राजाने चांगले राज्य केले. परंतु नंतर तो एक दुष्ट राजा बनला व त्याने देवाची आज्ञा मानली नाही, म्हणून देवाने त्याच्या जागी राज्य करण्यासाठी दुसऱ्या मनुष्यास नियुक्त केले.



शौलानंतर देवाने दाविद नावाच्या एका तरुण इस्त्रायली पुरुषास राजा म्हणून निवडले. दाविद हा बेथलेहेम नगरातील एक मेंढपाळ होता. आपल्या पित्याची मेंढरे चारीत असताना दाविदाने अनेकदा मेंढरांवर हल्ला करणाऱ्या सिंह व अस्वलास जीवे मारिले होते. दाविद हा देवाचे भय बाळगणारा नम्र व धार्मिक पुरुष होता.



दावदि मोठा होऊन एक शूरवीर व पुढारी झाला. दावदि लहान असतानाच त्याने गोलयिाथ नावाच्या एका राक्षसी मुनष्याबरोबर युध्द केले. गोलयिथ हा एक प्रशक्षिति, बलाढय व तीन मीटर उंचीचा सैनकि होता. परंतू देवाने दावदिाचे सहाय्य केले व त्याच्याकरवी गोलायथाचा वध करुन इस्त्रायल्यांस सोडवलि. त्यानंतर दावदिाने अनेक शत्रू राष्टांवर वजिय मळिवलि व लोकांनी त्याची प्रशंसा केली.



लोक दावदिाची प्रशंसा करत असेलेले पाहूल शौलाला त्याचा हेवा वाटू लागला. शौलाने अनेकदा त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केला, पण दावदिाने स्वत:स लपवलि. एके दविशी शौल दावदिास मारण्यास्तव शोधति होता. दावदि लपून बसलेल्या गुहेमध्ये शौल गेला, परंतू शौल त्याला सापडला नाही. दावदि आता शौलाच्या अगदी जवळ होता व तो त्याला मारु शकत होता, पण त्याने तसे केले नाही. त्याऐवजी दावदिाने शौलाचे वस्त्र फाडीले व सधि्द केले की राजा बनण्यासाठी तो शौलाचा वध करणार नाही.



शेवटी शौल युध्दात मरण पावला आणि दाविद इस्त्रायलाचा राजा झाला. तो खूप चांगला राजा होता व लोक त्याजवर प्रेम करत. देवाने दाविदास आर्शिवादीत केले व तो यशस्वी झाला. दाविदाने अनेक युध्द केले व देवाने त्यास इस्त्रायलांच्या शत्रूस पराजित करण्यास सहाय्य केले. दाविदाने यरुशलेमवर विजय प्राप्त केला व तिस आपली राजधानी बनविले. दाविदाच्या कारकीर्दीत इस्त्रायल सशक्त व श्रीमंत राष्ट बनले.



दाविद एक मंदिर बांधणार होता व त्यामध्ये यहुदी लोक देवाची उपासनला व अर्पणे घेऊन येणार होते. गेली 400 वर्षे लोक मोशेने बांधलेल्या दर्शन मंडपाच्या समोर लोक अर्पणे आणत व देवाची उपासना करत.



परंतु देवाने नाथान भवषि्यवक्यास दावदिाकडे संदेश घेऊन पाठवपिले," तू युध्द करणारा पुरुष असल्यामुळे हे मंदरि उभारु शकत नाही. तूझा पुत्र ते मंदरि उभारलि. परंतू मी तूला खूप आर्शविादीत करीन. तूझ्याच बंशातील एक पुरुष माझ्या लोकांवर सर्वकाळ राज्य करील! सर्वकाळ राज्य करणारा दावदिाच्या वंशातील एकमेव पुरुष म्हणजे मसीहा." मसहि हा जगातील लोकांना त्यांच्या पापांपासून सोडवणिारा देवाचा अभषिक्ति होता.



दावदिाने हे ऐकल्यावर लगेच देवाचा धन्यवाद केला व त्याची स्तूती केली, कारण देवाने त्याला एवढा मोठा आर्शविाद दलिा होता. देव हे कधी पूर्ण करील यावषियी दावदिास कल्पना नव्हती. परंतु असे झाले की मसीहा येण्याच्या अगोदर इस्त्रायली लोकांना जवळ जवळ 1000 वर्षे त्याची प्रतक्षिा करावी लागली.



दावदिाने न्यायाने व वश्विासूपणाने अनेक वर्षे राज्य केले व देवाने त्यास आर्शविादति केले. तथापी त्याच्या अंतमि समयी त्याने देवावरिुध्द भयंकर पाप केले.



एके दविशी दावदिाचे सर्व सैन्य युध्दासाठी बाहेर गेले असताना, त्याने आपल्या राजमहलातून एक सुंदर स्त्री स्नान करीत असताना पाहलिी. तचिे नाव बेथशेबा होते.



पुढचा वचिार न करता दावदिाने त्या स्त्रिस आपणाकडे बोलावून घेतले. त्याने तचि्याशी संभोग केला व तलिा आपल्या घरी पाठवून दलिे. काही काळानंतर आपण गरोदर असल्याचा नरिोप तनिे दावदिास पाठवलिा.



बेथशेबाचा पती उरीया हा दावदिाचा उत्कूष्ठ योध्दा होता. दावदिाने उरयिास युध्दातून परतण्यास व आपल्या पत्नी बरोबर राहण्यास घरी बोलावले. परंतु दूसरे सैनकि युध्द करत असताना आपण घरी जाणे योग्य नव्हे असे समजून त्याने परतण्यास नकार दलिा. म्हणून दावदिाने उरयिास युध्दामध्ये पाठवलिे व सेनापतीस सांगतिले की त्याने अधकि धोक्याच्या ठकिाणी उरयिाची नेमणूक रावी म्हणजे उरयिा युध्दात मारला जाईल.



उरयिा मेल्यानंतर दावदिाने बेथशेबाशी लग्न केले. नंतर तनिे दावदिाच्या पुत्रास जन्म दलिा. दावदिाने केलेल्या कृत्याबद्दल देवाचा क्रोध भडकला, व त्याने नाथान संदेरष्टयाला दावदिाकडे पाठवून त्याचे पाप कतिी घाणेरडे होते यावषियी सांगतिले. दावदिाने आपल्या पापावषियी पश्चाताप केला आणि देवाने त्यास क्षमा केली. नंतर मरेपर्यंत दावदिाने अगदी कठणि प्रसंगी देखलि देवाच्या आज्ञा प्रामाणकिपणाने पाळल्या.



परंतु आपल्या पापाची शक्षिा म्हणून दावदिाचा पुत्र मरण पावला. दावदिाच्या कुटुंबात नंतर सतत तंटा होत राहलिा व त्याचे सामर्थ्यही कमी झाले. जरी दावदि देवाशी अवश्विासू राहलिा होता तरीही देव आपले वचन पाळण्यासाठी दावदिाशी वश्विासू राहलिा. नंतर दावदि व बेथशेबा यांना आणखी एक पुत्र झाला, आणि त्यांनी त्याचे नाव शलमोन असे ठेवले.

*1*

# 18. विभाजित राज्य



बऱ्याच वर्षानंतर, दावदि मरण पावला आणि त्याचा पुत्र शल्मोन हा इस्त्रायलवर राज्य करु लागला. देवाने शल्मोनास दर्शन दलिा व त्यास काय हवे आहे असे वचिारले. जेंव्हा शल्मोनाने बुध्दि मागतिली तेंव्हा देव त्याच्यावर प्रसन्न झाला व त्याने त्याला जगातलि सर्वांत ज्ञानी मनुष्य बनवलि. शल्मोन अनेक गोष्टी शकिला व तो एक सुज्ञ न्यायकर्ता झाला. देवाने त्यास खूप श्रीमंतही बनवलि.



दावदिाने आखलेल्या योजनेप्रमाणे शल्मोनाने यरुशलेममध्ये एका मंदरिाची उभारणी केली. आता लोक दर्शनमंडपासमोर आराधना न करता मंदरिामध्ये अर्पण व आराधना करु लागले. देवाची उपस्थति त्या मंदरिामध्ये होती. देव आपल्या लोकांमध्ये वस्ती करु लागला.



परंतू शलमोन परराष्टीय स्त्रियांवर प्रेम करु लागला. त्याने अनेक स्त्रियांशी विवाह करुन देवाची आज्ञा मोडली. त्याने 1000 स्त्रियांशी विवाह केला! त्यापैकी अनेक स्त्रिया परराष्टीय होत्या त्यांनी आपली दैवते बरोबर आणली व त्यांची पूजा करु लागल्या. शलमोन वृध्द झाल्यानंतर त्यानेही त्यांच्या दैवतांची पूजा केली.



देव शलमोनाने केलेल्या कृत्यांवषियी त्याजवर कोपला. त्याच्या हया अवश्विासूपणाबद्दल देवाने त्यास शासन केले. देवाने शलमोनाच्या मृत्यूनतंर इस्त्रायलाच्या राज्याचे दोन भाग केले.



शल्मोनाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र रहोबाम हा राजा झाला. रहोबाम हा मूर्ख मनुष्य होता. इस्त्रायलातील सर्व लोक त्याचा राज्यभिषेक करण्यास एकत्र आले. त्यांनी रहोबामाकडे तक्रार केली की, शल्मोनाने त्यांना खूप परिश्रम करण्यास भाग पाडले व जास्त प्रमाणात कर वसूल केला.



रहोबामाने मूर्खपणाचे उत्तर दिले,"तुम्हांस वाटले असेल की माझा पिता शल्मोन हयाने तुमच्याकडून परिश्रम करुन घेतले, परंतु मी तर त्याहीपेक्षा अधिक परिश्रक तुमच्याकडून करुन घेईन व तुमच्याशी क्रूरतेने वागेल."



इस्त्राएलांच्या गोत्रांपैकी दहा गोत्रांनी एकत्र येऊन रहोबामाविरुध्द बंड पुकारले. केवल दोनच गोत्रे त्याच्याशी विश्वासू राहिले. ही दोन गोत्रे यहूदाचे राज्य असे झाले.



अन्य बंडखोर दहा गोत्रांनी जेरोबाम नावाच्या मनुष्यास आपला राजा म्हणून नियुक्त केले. त्यांनी आपल्या भूमिच्या उत्तरेस राज्याची स्थापना केली व त्यांस इस्त्रायलचे राज्य असे संबोधन्यात आले.



जेरोबामाने देवाविरुिध्द बंड पुकारले व लोकांना पापात पाडलिे. यहूदाच्या राज्यामध्ये असलेल्या देवाच्या मंदरित उपासना न करता त्याने आपल्या लोकांसाठी दोन मूर्ति स्थापन केल्या व त्यांची पूजा करु लागल्या.



आता यहूदाचे राज्य व इस्त्रायल एकमेकांचे शत्रू झाले व त्यांच्यामध्ये नेहमी लढाया होऊ लागल्या.



इस्त्रायलाच्या नवीन राज्यामध्ये सर्वच राजे दुष्ट होते. त्यांपैकी बहुतेक राजांचा वध अन्य इस्त्रायल्यांनीच केला जे त्यांच्या जागी राज्य करु पाहात होते.



सर्व राजे व इस्त्रायलाच्या राज्यातील बहुसंख्य प्रजा मूर्तिची पूजा करु लागले. त्यांच्या हया मूर्तपूजेमध्ये बहुदा व्यभिचार व नरबलि (बालकांचे अर्पण) यांचा समावेश होता.



यहूदाचे राजे हे दावदिाच्या वंशातील होते. त्यांपैकी काही राजे चांगले होते. त्यांनी न्यायाने राज्य केले व खऱ्या देवाची उपासना केली. परंतु यहूदाच्या राजांपैकी अनेक राजे दुष्ट असे होते. त्यांनी भ्रष्ट होऊन मूर्तपूजा केली. त्यापैकी काही राजांनी तर स्वत:च्या मुलांचेही अर्पण खोटया देवांसाठी केले. यहूदाच्या राज्यातील बहुसंख्या प्रजेने ही देवाविरुध्द बलवा करुन अन्य दैवतांची पूजा केली.

# 19. संदेष्ट्ये



इस्त्रायलाच्या संपूर्ण इतिहासामध्ये देवाने त्यांना संदेष्ट्ये पाठविली. संदेष्ट्ये देवाकडून संदेश आणत व तो लोकांपर्यंत पोहचवति असत.



अहाब राज्याच्या काळामध्ये इस्त्रायलमध्ये एलयिा हा संदेरष्टा होता. अहाब हा एक दुष्ट राजा होता व त्याने लोकांस बालदेवाची उपासना करावयास प्रोत्साहति केले. एलयिा अहाबास म्हणला,“जोपर्यंत मी बोलत नाही तोपर्यंत इस्त्रायलमध्ये पाऊस पडणार नाही.” हे ऐकून अहाब क्रोधति झाला.



आहाब एलयिास जीवे मारु इच्छित होता म्हणून देवाने एलयिास जंगलातील एका नाल्याजवळ लपण्यासाठी जाण्यास सांगतिले. प्रत्येक दविशी सकाळी व संध्याकाळी पक्ष्यांच्या द्वारे देवाने त्यास भोजन पूरवलिे. आहाब व त्याचे सैन्य एलयिास शोधत होते, पण त्यांना तो सापडला नाही. दुष्काळ एवढा भयानक होता की शेवटी तो ओढाही आटला.



म्हणून एलयिास शेजारच्या देशामध्ये गेला. त्या देशात दुष्काळामध्ये राहणारी एक वधिवा व तचिा मुलगा यांच्याकडे असणारी अन्नसामग्री एकदम संपत आली होती. परंतु त्यांनी एलयिाची काळजी घेतली, म्हणून देवाने त्यांच्या गरजा पूर्ण केल्या व त्यांच्या डब्यातले पठि व कुप्पीतील तेल कधचि संपले नाही. संपूर्ण दुष्काळ संपेपर्यंत त्यांच्याकडे अन्न उपलब्ध होते. एलयिा त्या ठकिाणी कति्येक वर्ष राहलिा.



‌साडेतीन वर्षानंतर देवाने एलयिास इस्त्रायलच्या राज्यात जाऊन देव आता पाऊस पाठवणिार आहे याची अहाब राजासमोर घोषणा करावयास सांगतिली. ‌जेव्हा आहाबाने एलयिास पाहलिे तेंव्हा तो म्हणाला,“अरे हो आम्हावर संकट आणणारा परत आला!” ‌एलयिाने त्यास उत्तर दलिे,“संकट आणणारा तर तू आहेस ! ‌तू आपला खरा देव याव्हे यास सोडून बालदेवतेची पूजा करु लागला आहेत. ‌आता इस्त्रायलाच्या सर्व लोकांना कार्मेल पर्वताकडे घेऊन ये.”



‌तेंव्हा इस्त्रायलाच्या राज्यातील सर्व लोक, बालदेवतेच्या 450 संदेष्टयांसहति कार्मेल पर्वताडकडे आली. ‌एलयिा लोकांस म्हणला,“तुम्ही कर्ती वेळा आपले मन बदलणार ? ‌जर याव्हे हा खरा देव असेल तर त्याचीच सेवा करा! ‌जर बाल देव असेल तर त्याची सेवा करा!"



मग एलियि बालदेवतांच्या संदेष्ट्यांस म्हणाला,“एक बैल मारा व अर्पण तयार करा पण त्यास आग लावू नका. मीही तसेच करील. जो देव अग्नि पाठवलि तोच खरा देव.” अशा प्रकारे बालदेवतेच्या याजकांनी होमार्पण तयार केले पण त्यास आग लावली नाही.



मग बालदेवतेचे संदेष्टये प्रार्थना करु लागले,“बालदेवता, आमचे ऐका!” ते दविसभर ओरडत होते, त्यांनी स्वत:लाही चाकूने कापले तरीही त्यांना प्रार्थनेचे उत्तर मळिाले नाही.



शेवटी संध्याकाळच्या समयी एलयिाने देवासाठी होमार्पण तयार केले. मग त्याने लोकांस बारा घागरी पाणी त्या वेदीवर ओतण्यास सांगतिले. होमबली व इंधने त्यामध्ये संपूर्णपणे बुडाली व पाणी वेदविरुन सभोवार वाहलिे.



मग एलयिाने प्रार्थना केली,“हे परमेश्वरा, अब्राहाम, इसहाक व याकोबा यांच्या देवा, इस्त्रायलामध्ये तूच देव आहेस व मी तुझा सेवक आहे हे सर्वांस वदिति कर. मला उत्तर दे म्हणजे तूच खरा देव आहेस अशी या लोकांना खात्री पटेल."



तेंव्हा परमेश्वरापासून अग्नि उतरला आणि त्याने होमबली, इंधने, धोंडे आणि माती ही भस्म करुन टाकिली आणि त्या खळग्यातले पाणीही चाटिले. हे पाहून सर्व लोक पालथे पडून म्हणाले, परमेश्वर (याव्हे) हाच देव ! याव्हे हाच देव!”



तेंव्हा यलयिा त्यांस म्हणाला,“बथालाच्या संदेष्टयांस पकडा; त्यातल्या एकासही नसिटून जाऊ देऊ नका !” तेंव्हा त्यांनी त्यांस पकडिले; एलीयाने त्यास दूर नेऊन त्यांस जीवे मारिले.



मग एलीया अहाब राजास म्हणाला,“उठ, खा,पी; वपुिल पर्जन्यवृष्टचिा ध्वनी होत आहे.” लगेच आकाशामध्ये काळे ढग उत्पन्न होऊन मुसळधार पाऊस पडू लागला. यावहे देवाने अशाप्रकारे दुष्काळावर मात करुन आपण जीवंत व खरा देव आहे हे सधि्द केले.



एलीया नंतर देवाने एलशिा नावाच्या संदेष्टयास नयिुक्त केले. देवाने एलशिाद्वारे अनेक चमत्कार केले. एक चमत्कार आर्मी कमांडर नामान ज्याला भयंकर चर्मरोग होता, त्याच्यावर करण्यात आला. त्याने एलशिावषियी ऐकले होते म्हणून तो त्याच्याकडे गेला व आपणास बरे करा अशी वनिंती केली. एलशिाने नामानास यार्देन नदीमध्ये सात वेळा डुबकी मारण्यास सांगतिले.



सुरुवातीस नामानास राग आला व असे करण्यास तो तयार झाला नाही, कारण ते त्याला मूर्खपणाचे वाटले. परंतु नंतर त्याला पश्चाताप झाला व त्याने यार्देन नदीमध्ये जाऊन सात वेळा डुबकी मारली. जेंव्हा सातव्या वेळी त्याने डुबकी मारली तेंव्हा त्याचे कोढ पूर्णपणे बरे झाले! देवाने त्याला बरे केले होते.



देवाने अन्य संदेष्टयेही पाठवलि. त्या सर्वांनी लोकांना मूर्तीपूजा बंद करुन न्याय व दया दाखवण्ियाची शकिवण दलिी. संदेष्टयांनी त्यांना चेतावनी दलिी की जर त्यांनी आपला वाईट मार्ग सोडून देवाच्या आज्ञा पाळल्या नाहीत तर देव त्यांना दोषी ठरवून त्यांना शक्िषा करील.



अनेकदा लोकांनी देवाच्या आज्ञा पाळल्या नाहीत. त्यांनी वारंवार संदेष्टयांचा अपमान केला व त्यांस जीवे मारलि. एकदा त्यांनी वरि्मिया संदेष्टयास कोरडया वहिरीमध्ये ढकलून दलि व मारण्याचा प्रयत्न केला. वहिरीच्या तळाशी असलेल्या गाळामध्ये तो फसला गेला, परंतु नंतर राजाला त्याची दया आली व मरण्याच्या अगोदर त्याला बाहेर काढण्याची त्याने आज्ञा दलि.



जरी लोक त्यांचा द्वेष करत होते, तरी संदेष्टयांनी देवाच्या वचनाचा प्रचार चालू ठेवला. त्यांनी लोकांस चेतावनी दलि की जर त्यांनी देवाची आज्ञा पाळली नाही व पश्चाताप केला नाही तर देव त्यांचा नाश करील. देवाच्या नविडलेला मसहिा (ख्रस्ित) येणार आहे याचीही त्यांनी त्यांना आठवण करुन दलि.

# 20. हद्दपारी आणि वापसी



इस्त्रायलाचे राज्य व यहूदाचे राज्य या दोहोनीही देवाविरुध्द पाप केले. देवाने त्यांच्याशी सनिाय पर्वतावर केलेला करार त्यांनी तोडला. देवाने त्यांनी पश्चाताप करावा व देवाकडे वळावे म्हणून भविष्यिवक्ते पाठवलिे, परंतु त्यांनी आज्ञा मानलिी नाही.



म्हणून देवाने त्या दोन्ही राज्यांचा त्यांच्या शत्रूकरवी नाश करवलिा. असरियिा हया दुष्ट व शक्तिशाली राष्टाने इस्त्रायलाचा नाश केला. असरियिाने इस्त्रायलाच्या अनेक लोकांस जीवे मारलिे, लूटपाट व जाळपोळ केली.



असरियिांनी सर्व नेत्यांस, श्रीमंतांस व कुशल कारागरिांस एकत्र करुन आपल्या देशामध्ये नेले. केवळ गरीब इस्त्रायली ज्यांचा युध्दामध्ये बचाव झाला, तेच इस्त्रायलमध्ये शलि्लक राहलिे.



तेंव्हा असरियिाने इस्त्रायल राहत असलेल्या ठकिाणी परराष्टीय लोकांस वस्ती करण्यासाठी आणलिे. परराष्टीयांनी नाश झालेल्या शहरांची पुनर्बांधनी केली व इस्त्रायली स्त्रियिांशी ववािह केला. इस्त्रायली वंशातील ज्या लोकांनी परराष्टीय स्त्रियिांशी ववािह केला त्यांना शोमरोनी म्हणण्यात आले.



यहूदारतील राज्यातील लोकांनी पाहिले की, इस्त्रायलाच्या राज्यातील लोकांना आज्ञाभंगा बद्दल देवाने कशाप्रकारे शासन केले आहे. पण तरीही त्यांनी मूर्तपूजा केली व कनानी दैवतांचीही उपासना केली. देवाने चेतावणी देण्यासाठी त्यांच्याकडे संदेष्टये पाठविले, पण त्यांनी त्यांचेही ऐकले नाही.



सुमारे 100 वर्षांनंतर जेंव्हा असरीयाने इस्त्रायलच्या राज्याचा नायनाट केला, तेंव्हा देवाने यहूदाच्या राज्यावर हल्ला करण्यासाठी नबूकदनेझर हया बाबेलच्या राजास पाठविले. बाबेल हे एक शक्तिशाली राष्ट होते. यहूदाचा राजा नेबुकदनेझराचा सेवक बनण्यास तयार झाला व प्रतविर्षी मोठया प्रमाणात पैसे देण्यासही तयार झाला.



परंतु काही वर्षांनंतर यहूदाच्या राजाने बाबेल विरुध्द बंड पुकारले. म्हणून बाबेलच्या लोकांनी परत येऊन यहूदाच्या राज्यावर चढाई केली. त्यांनी यरुशलेम शहर ताब्यात घेतले, मंदिराचा नाश केला व त्यांतलि सर्व संपती घेऊन गेले.



त्यांच्या हया बंडखोरपणाबद्दल शासन म्हणून नेबूकदनेझरच्या सैनिकांनी यहूदाच्या राजाच्या मुलांचा त्याच्या समोर वध केला व यहूदाच्या राजाचे डोळे फोडून त्यास आंधळे केले. त्यानंतर त्यांनी त्यास मारण्यासाठी बाबेल येथलि तुरुंगात ठेवले.



नेबुकदनेसर व त्याच्या सैनिकांनी यहूदाच्या राज्यातील जवळ जवळ सर्वच लोकांना बाबेलमध्ये आणिले केवळ गरीब इस्त्रायल्यांनाच शेती करण्यासाठी मागे सोडिले. ह्याच कालावधित जेंव्हा देवाच्या लोकांस वचनदत्त देश सोडून जाण्यास सक्ति करण्यात आली, त्यास हद्दपारी असे म्हणतात.



जरी देवाने आपल्या लोकांना त्यांच्या पापांमुळे हद्दपार केले तरीही तो आपण दिलेले वचन विसरला नाही. देवाची आपल्या लोकांवर कृपादृष्टी होती व संदेष्टयांच्या द्वारे चेतावनी देत असे. त्याने त्यांना आश्वासन दिले की सत्तर वर्षांनंतर तो त्यांना परत वचनदत्त देशात घेऊन येईल.



त्यानंतर सुमारे सत्तर वर्षांनी पर्सयिाचा राजा सायरस हयाने बाबेलचा पराभव केला व बाबेलच्या राज्याची जागा पर्सयिाच्या राज्याने घेतली. इस्त्रायली लोक आता यहूदी या नावाने ओळखले जाऊ लागले व त्यांच्यापैकी अधकिांश लोक मरेपर्यंत बाबेलमध्येच राहलि. केवळ थोडयाशा वयोवृध्द यहूद्यांनाच यहूदाच्या राज्याचे स्मरण होते.



पर्सयिाचे साम्राज्य शक्तशिाली होते, परंतु आपण पराभूत केलेल्या लोकांवषियी ही ते दयाळू होते. सायरस पर्शयिाचा राजा झाल्यानंतर लगेच त्याने फर्मान काढले की जर कोणी यहूदी यहूदामध्ये परत जाऊ इच्छितो तर त्याला असे करण्याची अनुमती आहे. त्याने त्यांना खंडहर झालेल्या मंदरिाचे बांधकाम करण्यासाठी पैसाही पुरवलाि! अशा प्रकारे सत्तर वर्षाची हद्दपारी संपवून यहूद्यांचा छोटा समूह यहूदातील यरुशलेमेस परतला.



यरुशलेमेस आल्यानंतर त्यांनी मंदरिाचे पुनर्वसन केले व शहराच्या वेशी पुन्हा बांधल्या. जरी अद्याप त्यांच्यावर अन्य लोकांचे वर्चस्व होते, तरी आता पुन्हा एकदा वचनदत्त देशामध्ये ते राहू लागले व मंदरिामध्ये देवाची उपासना करु लागले.

*A Bible story from: 2 राजा 17; 24–25; 2 इतिहास 36; एज्रा 1–10; नहेम 1–13*

# 21. देव मसिहाची प्रतिज्ञा करतो



आरंभापासूनच मसहिाला पाठवण्याची देवाने योजना बनवलिी होती. मसहिाची सर्वप्रथम प्रतज्ञिा आदाम व हव्वा यांच्याकडे आली. देवाने वचन दलिे की हव्वेचा एक वंशज उत्पन्न होऊन सापाचे डोके फोडील. ज्या सर्पाने हव्वेस फसवलिे तो सैतान होता. हया अभवचिनाचा अर्थ असा होता की मसीहा सैतानास पूर्णपणे पराजति करील.



देवाने अब्राहामास असे वचन दलिे की त्याच्या द्वारे जगातील सर्व कुळे आर्शवािदति होतील. मसीहाच्या दुसर्‍या आगमनसमयी हया अभवचिनाची पुर्तता होईल. तो प्रत्येक राष्टातील प्रत्येक लोकगटाच्या लोकांचे तारण करील.



देवाने मोशेस वचन दिले होते की भविष्यामध्ये तो मोशेसारखाच एक संदेष्टा पाठविल. हे मसीहाविषयीचे दुसरे अभिवचन होते. जे काही काळानंतर पूर्ण होणार होते.



देवाने दाविद राजास अभिवचन दिले की त्याच्याच वंशातील एक जण देवाच्या लोकांवर सर्वकाळ राज्य करील. त्याचा अर्थ असा होता की मसीहा हा दाविदाच्याच घराण्यात जन्मास येणार होता.



यिर्मया संदेष्टयाच्या द्वारे देवाने वचन दिले की तो एक नवा करार करणार आहे परंतु तो सिनाय पर्वतावर इस्त्रायलांबरोबर केलेल्या करारापासून भिन्न असेल. नव्या करारामध्ये देव आपल्या आज्ञा मनुष्यांच्या हृदयपटलावर लिहिल, ते त्याचे लोक होतील, आणि देव त्यांच्या अपराधांची क्षमा करील. मसिहा या नव्या कराराचा आरंभ करील.



देवाच्या संदेष्टयांनीही सांगितले होते की मसीहा हा एक संदष्टा, याजक आणि राजा असेल. संदेष्टा हा देवाचा संदेश घेऊन तो लोकांना पोहचवितो. देवाने अभिवचन दिलेला मसिहा हा एक परिपूर्ण संदेष्टा असेल.



इस्त्रायली याजक लोकांनी केलेल्या पापाचे प्रायश्चति म्हणून होमार्पण करत असत. याजक लोकांसाठी प्रार्थनाही करत असत. मसहिा हा एक सध्दि महायाजक असेल जो देवासमोर स्वत:चे बलदिान करील.



राजा म्हणजे जो लोकांवर राज्य करतो व त्यांचा न्याय करतिो. आपला पूर्वज दावदि याच्या संहिासनावर वरिाजमान होणारा मसीहा हा एक परपिूर्ण राजा असेल. तो संपूर्ण जगावर सर्वकाळ राज्य करील, आणि न्यायाने व नीतनिे योग्य नर्णिय घेईल.



देवाच्या भवषि्यवाद्यांनी मसीहावषियी अनेक भाकति केले होते. मलाखी संदेष्टयाने भाकति केले होते की मसहिा येण्याच्या अगोदर एक महान संदेष्टा उदयास येईल. यशया संदेष्टयाने भवषि्यवाणी केली की मसहिा हा एक कुमारीच्या पोटी जन्म घेईल. मीखा संदेष्टयोन सांगतिले की मसीहा बेथलेहेम नगरामध्ये जन्मास येईल.



यशया संदेष्टा म्हणाला की मसीहार गाललिमध्ये वास्तव करील, नरिाशामध्ये असलेल्या लोकांचे सांत्वन करील, आणि बिंदविानांना सोडवून स्वातंत्र्याची घोषणा करील. त्याने हेही सांगतिले की मसीहा आंधळया, मुक्या, बहरि्यांस व लंगडयांस बरे करील.



यशया संदेष्टयाने हेही भाकति केले की मसीहाचा वनिाकारण द्वेश केला जाईल व त्याला नाकारले जाईल. अन्य संदेष्टयांनी सांगतिले की मसीहास मारणारे लोक त्याचे कपडे वाटून घेण्यासाठी चठि्टया टाकतील आणा मिसीहाचा एक मति्रच त्याचा वश्विासघात करलि. एक संदेष्टा जखर्‍या हयाने भाकति केले की मसीहाला धरुन देण्यासाठी त्याच्या मति्रास वेतन म्हणून चांदीचे तीस नाणे दलिी जातील.



संदेष्टयांनी मसीहा कशा प्रकारे मरेल याचे भाकति केले. यशयाने सांगतिले की लोक मसहिावर थुंकतलि, त्याची थट्टा करतील व त्यास फटके मारतील. जर त्याने काहीही अपराध केला नाही. तरी त्यास खळिे ठोकून पीडादायक मरण देतील.



संदेष्टयांनी हेही सांगतिले की मसीहा परपिूर्ण व नष्पिाप असेल. तो अन्य लोकांच्या पापाचे प्रायश्चत्ति म्हणून मरेल आणि तो पुन्हा जीवंत होईल. त्याची शक्षिा मुनष्य आणि परमेश्वर यांमध्ये समेट घडवून आणलि. हया कारणास्तव मसीहास ठेचावे ही देवाची इच्छा होती.



संदेष्टयांनी भाकति केले की मसीहा मरेल आणि तो पुन्हा जीवंत होईल. मसीहाच्या मृत्यू आणि पुनरुत्थानाद्वारे देव आपली योजना पूर्ण करील, पाप्यांचे तारण करुन एक नवा करार प्रस्थापति करील.



देवाने संदेष्टयांना मसहिावषियी अनेक गोष्टी प्रकट केल्या, परंतु त्या संदेष्टयांच्या समयामध्ये मसचिा आला नाही. शेवटच्या भवषि्यवाणीनंतर सुमारे 400 वर्षांनी काळाची पूर्णता झाल्यानंतर देवाने मसहिास या जगामध्ये पाठवलिे.

बायबल कथा*: उत्पत्ति 3:15; 12: 1 −3;* अनुवाद *18:15; 2* शमूवेल *7;* यर्मिया *31;* यशचा *59:16;* दानयि्येल*7;* मलाखी *4 : 5;* यशचा *7:147;* मखिा *5 : 2;* यशया *9:1−7; 35 : 3−5; 61; 53;* स्त्रोत *22 : 18; 35 : 19; 69 : 4; 41 : 9* जखर्‍या *11 : 12 − 13;* यशचा *50 : 6;* स्त्रोत्र *16 : 10−11*

# 22. **योहानाचा जन्म**



पूर्वीच्या काळी देव आपल्या लोकांशी देवदूत व संदेष्टयांद्वारे बोलला. परंतु त्यानंतर 400 वर्ष तो लोकांशी बोलला नाही. अचानक एके दविशी जखऱ्या नावाच्या एका वयोवृध्द याजकाकडे एक देवदूत एक संदेश घेऊन आला. जखऱ्या व त्याची पत्नी अलशिबा हे धार्मकि लोक होते, पण त्यांना मुळबाळ नव्हते.



देवदूत जखऱ्यास म्हणाला,“तुझ्या पत्नीस मुलगा होणार आहे.” त्याचे नाव तूम्ही योहान असे ठेवा. तो पवत्रि आत्म्याने परपिूर्ण होऊन मसहिाच्या आगमनासाठी लोकांची तयारी करील !” जखऱ्याने उत्तर दलि,“मी आणि माझी पत्नी आता खूप म्हातारे झालो आहोत आणि आता आम्हास मुले होउ शकत नाहीत! हे कसे शक्य आहे?”



देवदूत जखऱ्यास म्हणाला,“तुला ही सुवार्ता सांगण्यासाठी देवाने मला पाठविले आहे. तू माझ्या वचनावर विश्वास ठेविला नाही, म्हणून बाळाचा जन्म होईपर्यंत तू मुका होशील. लगेच जखऱ्या मुका झाला. तेंव्हा देवदूत जखऱ्यास सोडून गेला. त्यानंतर जखऱ्या घरी आला आणि त्याची पत्नी गर्भवती झाली.



जेव्हा अलशिबा ही सहा महिन्यांची गरोदर होती, तेंव्हा तोच देवदूत अलशिबिाच्या नात्यातील मरीयेस प्रकट झाला. ती कुमारी होती व योसेफ नावाच्या मनुष्याबरोबर तीचे वाग्दान झाले होते. देवदूत म्हणाला,“तू गर्भवती होऊन तूला पुत्र होईल. व त्याचे नाव तू येशू ठेवशील. तो परात्पर परेमश्वराचा पुत्र असून सर्वकाळ राज्य करील.”



मरीया उत्तरली,“हे कसे होणार, मी तर कुमारी आहे?” देवदूताने स्पष्ट केले,“पवित्र आत्मा तुझ्यावर येईल, आणि देवाचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील. यास्तव ते बाळ पवित्र, देवाचा पुत्र असेल.” देवदूताने सांगितिलेल्या वार्तेवर मरीयेने विश्वासू ठेवला.



देवदूताच्या भेटीनंतर लगेच मरीया आपली बहिण अलिशिबा हीस भेटण्यास गेली. मरीयेचे हे अभिवादन ऐकताच अलिशिबेच्या उदरातील बाळाने आनंदाने उडी मारली. देवाने त्यांच्यासाठी काय केले आहे हयाविषियी दोन्ही स्त्रियांना फार आनंद झाला. अलिशिबेस भेटून तीन महिन्यानंतर मारिया आपल्या घरी परतली.



अलशिबिने आपल्या पुत्रास जन्म दलि्यानंतर देवदूताने सांगतिल्याप्रमाणे जखर्या व अलशिबिने त्याचे नाव योहान असे ठेवलि. तेंव्हा देवाने जखर्यास पुन्हा बोलण्याची अनुमता दिली. जखर्या म्हणला,"परमेश्वराची स्तुती असो, कारण त्याने आपल्या लोकांचे स्मरण ठेवलि आहे! तू, माझ्या पुत्रा, एक महान संदेष्टा होशलि जो आपल्या पापक्षमेची घोषणा करशिलि !"

बायबल कथा: *Luke 1*

# 23. येशूचा जन्म



मरीयेचा साखरपूडा योसेफ नावाच्या एका धार्मकि पुरुषाबरोबर झाला होता. मारयिा गरोदर असल्याचे एकून त्याला कळले की, हे बाळ त्याचे नव्हे. तो धर्मी पुरुष असल्यामुळे मारयिेची अब्रु वाचवण्यिासाठी त्याने गुप्तपणे तलिा सोडण्याची योजना बनवलिी. त्याने असे करण्यापूर्वी देवाच्या एका दूताने स्वप्नामध्ये त्याला दर्शन दलिे.



देवदूत म्हणाला,“योसेफा, मारयिेस तू आपली पत्नी म्हणून स्वकिारण्यास भऊि नकोस. तच्यिा उदरामध्ये असणारे बाळ हे पवत्रि आत्म्यापासून आहे. ती आपला पुत्रास जन्म देईल. व त्याचे नाव येशू (अर्थात, ‘देव तारतिो’) असे ठेवलि, कारण तो आपल्या लोकांना त्यांच्या पापांपासून सोडवलि.”



तेंव्हा योसेफाने मारयिेशी ववािह केला व आपली पत्नी म्हणून तचिा स्वकिार केला, परंतु त्या बाळाचा जन्म होईपर्यंत त्याने तचि्याशी समागम केला नाही.



जेंव्हा बाळाचा जन्म होण्याचा समय जवळ आला, तेंव्हा रोमी सरकाने जणगणना करण्यासाठी आपापल्या गावी जाण्याची घोषणा केली. योसेफा आणि मारयिा यांना नासरेथहून बेथलेहेम असा लांब प्रवास करावा लागला, कारण त्यांचा पूर्वज दावदि हा बेथलेहेम नगरात राहात होता.



बेथलेहेम नगरात पोहोचल्यावर त्यांना उतरायला जागा मिळाली नाही. शेवटी त्यांना एका गोठयामध्ये थारा मिळाला. बाळाचा जन्म त्या गोठयामध्ये झाला व त्याच्या आईने त्यास दावणीमध्ये ठेवले. त्यांनी त्याचे नाव येशू ठेवले.



त्या रात्री, काही मेंढपाळ आपली मेंढरे रानामध्ये राखीत होते. अचानक एक चमकणरा देवदूत येऊन त्यांच्यासमोर प्रकट झाला, आणि ते खूप घाबरले. देवदूत म्हणाला, “भिऊ नका, कारण मी तुम्हास मोठया आनंदाची बातमी घेऊन आलो आहे. आज बेथलेहेम नगरामध्ये तुमच्यासाठी मसीहा, अर्थात तारणारा जन्मला आहे!”



“जा आणि त्याचा शोध घ्या, आणि तो तुम्हास बाळंत्याने गुंडाळलेला गव्हाणीमध्ये दृष्टसि पडेल.” अचानक, आकाशामध्ये देवदूत देवाची स्तूती करत गात होते,“उर्ध्वलोकी देवाला गौरव आणि ज्या मनुष्यांवर त्याची कृपा झाली आहे त्यांस शांती!”



मेंढपाळ लगेच येशूच्या जन्माच्या ठकिाणी पोहोचले आणि देवदूताने सांगतिल्याप्रमाणे त्यांना ते बाळ गव्हाणीमध्ये दृष्टसि पडले. हे पाहून त्यांना खूप आनंद झाला. मारयिेस ही खूप आनंद झाला. आपण जे पाहलिे व ऐकले त्यावषियी आनंद करत मेंढपाळ आपल्या मेंढरांकडे परतले.



थोडया वेळानंतर, पूर्व दशिला एक असाधारण तारा चमकत असतांना ज्ञानी लोकांनी पाहिला. त्यांना समजले की, हा यहूद्यांचा नवा राजा जन्मास आला आहे. म्हणून त्याचे दर्शन घेण्यासाठी त्यांनी दूरवर प्रवास केला. ज्या ठकिाणी येशू व त्याचे माता-पिता राहात होते, त्या ठकिाणी ते पोहचले.



येशू बाळास त्याची आई मारयिा हच्यिा मांडीवर पाहून त्यांनी दंडवत केला व त्याची उपासना केली. त्यांनी येशूबाळास मौल्यवान भेटवस्तू दल्यिा. तेंव्हा ते आपल्या घरी परतले

बायबल कथा:

# 24. योहान येशूचा बाप्‌तिस्‌मा करितो



जखऱ्या आणि अलशिबि यांचा पुत्र मोठा होऊन एक संदेष्टा बनतो. तो जंगलामध्ये राहत असे, रानमध व टोळ खात असे आणि त्याची वस्त्रे ऊंटाच्या कातडीपासून बनविलेली होती.



योहानाचे भाषण ऐकण्यासाठी अनेक लोक जंगलामध्ये जाऊ लागली. त्याने त्यांस प्रचार केला,"पश्चाताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे!"



योहानाचा संदेश ऐकून अनेक लोकांनी पश्चाताप केला आणि योहानाने त्यांना बाप्तस्मा दिला. अनेक धार्मिक पुढारी देखील बाप्तस्मा घेण्यासाठी आले, परंन्तु त्यांनी आपल्या पापांविषियी खरा पश्चाताप केला नव्हता व आपले पाप कबूल केले नव्हते.



योहोन त्या धार्मिक पुढाऱ्यांना म्हणाला,"सापाच्या पिल्लांनो! पश्चाताप करा आणि आपला मार्ग बदला. प्रत्येक झाड जे चांगले फळ उत्पन करत नाही, त्यास अग्निमध्ये टाकण्यास येईल. संदेष्टयांच्या या वचनाची पूर्णता योहानाने केली, "पहा, मी आपला दूत तूझ्याकडे पाठवित आहे, तो तुझ्यासाठी मार्ग तयार करील."



काही यहूद्यांनी योहानाला तो मसहि आहे की काय असे वचिारले. योहान म्हणला,“मी मसहि नाही, परंतू माझ्या मागून एकजण येत आहे. तो एवढा महान आहे की, त्याच्या वाहणेचा बंध सोडण्याची माझी पात्रता नाही.”



दूसर्‍या दविशी येशू योहानाकडून बाप्तस्मिा घेण्यासाठी आला. योहानाने त्यास पाहून म्हटले,“पाहा! देवाचा कोकरा जो संपूर्ण जगाचे पाप हरण करणार होय.”



योहान येशूला म्हणाला,“मी तुला बाप्तस्मिा देण्यास योग्य नाही. तूच मला बाप्तस्मिा देण्याची आवश्यकता आहे. परंतू येशू त्यास म्हणाला,“तु मला बाप्तस्मिा दे, कारण देवाच्या दृष्टनिे हे योग्य आहे.” तेंव्हा योहानोने त्याला बाप्तस्मिा दलिा, जरयिेशूने काहीच पाप केले नव्हते.



जेव्हा येशू बाप्तस्मिानंतर पाण्यातून वर आला, तेंव्हा देवाचा आत्मा कबूतराच्या रुपामध्ये येऊन त्याच्यावर थांबला. त्याचवेळी आकाशवाणी झाली,“तू माझा परमप्रयि पुत्र आहेस, तुज वषियी मी संतुष्ट आहे.”



देवाने योहानास सांगतिले होते, “तू बाप्तस्मा दलिेल्या ज्या वक्तविर पवत्रि आत्मा उतरुन येईल. तोच व्यक्त िदेवाचा पुत्र असेल” एकच देव आहे. परन्तु जेव्हा योहानाने येशूला बाप्तस्मा दलिा, तेंव्हा त्याने देवपतिा बोलत असलेला पाहलिा, देवपुत्र येशू, आणि पवित्र आत्म्यासही त्याने पाहलिे.

बायबल कथा*:* मत्तय *3;* मार्क *1:9 – 11;* लूक *3: 1 – 23*

# 25. येशूची सैतानाकडून परकि्षा



बाप्तस्मि्यानंतर लगेच पवित्र आत्मा येशूला घेऊन जंगलामध्ये जातो, त्या ठिकाणी येशू चाळीस दिवस व चाळीस रात्र उपवास करतो. तेव्हा सैतानाने तेथे येवून येशूची परीक्षा पाहिली.



सैतानाने येशूला मोहात पाडले,“जर तू खरोखर देवाचा पुत्र आहेस, तर हया दगडांस भाकरी होण्याची आज्ञा कर म्हणजे तूला भोजन मिळेल!”



येशूने उत्तर दिले,“देवाच्या वचनामध्ये असे लिहिले आहे,‘मनुष्य केवळ भाकरीनेच नव्हे, तर देवाच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेन!”



मग सैतान येशूला घेऊन मंदिराच्या शिरोभागी उभे केले आणि त्याला म्हटले,“तू देवाचा पुत्र आहेस तर खाली उडी टाक, कारण असा शास्त्रलेख आहे की, ‘तो आपल्या दूतांना तुझ्याविषयी आज्ञा करील, आणि तुझा पाय धोंडयावर आपटू नये म्हणून ते तूला हातांवर झेलून धरतील.”



परन्तु येशूने सैतानाला धर्मशास्त्रातूनच उत्तर दिले. तो म्हणला,"देव आपल्या वचनास सांगतो,'तू आपला देव परमेश्वर याची व्यर्थ परीक्षा पाहू नकोस."



मग सैतानाने येशूला जगातील सर्व राज्ये व वैभव दाखविले व म्हणाला,"जर तू मला पाया पडून नमन करशील तर मी हे सगळे काही तुला देईल."



येशूने म्हटले,“अरे सैताना, चालता हो! देव आपल्या वचनामध्ये लोकांस आज्ञा करितो, परमेश्वर तुझा देव हयाला नमन कर व केवळ त्याचीच उपसना कर!”



अशा प्रकारे येशू सैतानाच्या परकि्षेत बळी पडला नाही, म्हणून सैतान तेथून नघिून गेला. तेंव्हा देवदूतांनी येऊन येशूची सेवा केली.

बायबल कथा: मत्तय *4:1-11;* मार्क *1:12-13;* लूक *4:1-13*

# 26. येशू आपल्या सेवेचा आरंभ करतो



सैतानाच्या परकि्षेवर वजिय मळिवलि्यावर येशू पवति्र आत्म्याने परपिूर्ण होऊन आपण राहत असलेल्या गालीलात परतला. येशू वचनाचे शकिवण देत अनेक ठकिाणी जात असे. प्रत्येक जण त्याच्यावषियी चांगलेच बोलत असे.



येशू आपण बालपणी राहात असलेल्या नाझरेथ या ठकिाणी गेला. शब्बाथ दविशी तो मंदरिामध्ये गेला. त्यांनी त्यास यशया संदेष्टयाचा ग्रंथ वाचण्यासाठी दलिा. येशून तो उघडून त्यतील एक शास्त्रपाठ वाचला.



येशूने वाचले,“परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे, कारण् दीनांस सुवार्ता सांगण्यास त्याने मला अभिषेक केला, त्याने मला पाठविले आहे, ते अशासाठी की, धरुन नेलेल्यांची सुटका व अंधळयांस पुन्हा दृष्टिचा लाभ हयाची घोषणा करावी. परेमश्वराच्या प्रसादाच्या वर्षाची घोषणा करावी.”



त्यानंतर येशू खाली बसला. प्रत्येकाने त्याला निरखून पाहिले. त्यांना ठाऊक होते की येशूने वाचलेला शास्त्रपाठ हा ख्रिस्ताविषयी होता. येशू म्हणला,“ हा शास्त्रलेख आज तुम्ही ऐकत असताना पूर्ण झाला आहे.” तेंव्हा सर्व त्याची वाहवा करु लागले. “हा योसेफाचा पुत्र ना?” ते म्हणू लागले.



मग येशू म्हणाला,“ कोणताही संदेष्टा स्वदेशात मान्य होत नाही हे खरे आहे. यलयिा संदेष्टयाच्या काळामध्ये इस्त्राएलामध्ये अनेक वधिवा होत्या. परंतू जेंव्हा साडेतीन वर्ष दुष्काळ पडता तेंव्हा देवाने इस्त्राएलांतील वधिवांना मदत करण्यास्तव यलयिास पाठवलि नाही, तर परराष्टीय वधिवेस मदत करण्यासाठी पाठवलि.”



येशू पुढे म्हणला, “आणा यिलयिा संदेष्टयाच्या काळामध्ये इस्त्राएलात अनेक कुष्टरोगी होते. परंतू यलयिाने त्यांपैकी कोणालाही बरे केले नाही. त्याने फक्त नामानास जो इस्त्रायल्यांच्या शत्रूंच्या सेनेचा सेनापती होता, बरे केले.” येशूचे भाषण ऐकत असलेले लोक यहूदी होते. यास्तव असे ऐकून त्यांना त्याचा खूप राग आला.



नासरेथातील लोकांनी येशूला पकडून ओढत पर्वताच्या कडयावरुन फेकून त्यास जीवे मारावे म्हणून नेले. परंतु येशूने गर्दतून पार होऊन नासरेथ नगर सोडले.



मग येशू गालिलातील प्रान्तामधून प्रवास करत गेला व पुष्कळसे लोक त्याकडे आले. त्यांनी त्याकडे अनेक आजारी, अपंग, मुके, बहिरे, आंधळे व पांगळे लोक घेऊन आले आणि येशूने त्यांना बरे केले.



दृष्टात्मागग्रस्त असे अनेक लोक येशूकडे आणलिे गेले. येशूच्या आज्ञेने ती भूते त्या मनुष्यांतून बाहेर नघािली व “तू देवाचा पुत्र आहेस!” अशी ओरडू लागली. मोठमोठया जनसमुदायाने आश्चर्यचकीत होऊन देवाची उपासना केली.



तेंव्हा येशूने बारा शष्यिांची नविड केली, त्यांना प्रेषति म्हणत. ते प्रेषति येशूबरोबर प्रवास करत आणा त्याच्यापासून शकित असत.

# 27. चांगल्या शोमरोण्याची गोष्ट



एके दिवशी यहूदी धर्मशास्त्रात पारंगत असलेला एक व्यक्ति येशूची परिक्षा पाहण्यासाठी येऊन म्हणाला,“गुरुजी सार्वकालिक जीवन प्राप्त करण्यासाठी मी काय करावे?” येशूने उत्तर दिले,“देवाचा नियम शास्त्रामध्ये काय लिहिले आहे?”



त्याने म्हटले,“तू आपला देव याजवर संपूर्ण मनाने, संपूर्ण जीवाने व संपूर्ण शक्तिने प्रीती कर. आणि जशी आपणावर तशी शेजार्यावर प्रीति कर.” येशूने उत्तर दिले,“अगदी बरोबर! हे कर म्हणजे तू सर्वकाळ राहशील.”



परंतु धर्मशास्त्राच्या पंडति स्वत:ला धार्मकि म्हणून सधि्द करु पाहात होता म्हणून त्याने वचिारले,“माझा शेजारी कोण आहे?”



येशूने एक गोष्ट सांगून त्या पंडतिास उत्तर दलिे. “एक यहुदी मनुष्य यरुशलेमेहून यरहिो नगरास रस्त्याने जात होता.”



“तो मनुष्य रस्त्याने जात असतांना लुटारुंच्या हाती सापडला. त्यांनी त्याकडे असलेली सर्व मालमत्ता घेऊन त्यास मारहाण केरुन अर्धमेल्या अवस्थेत सोडून गेले. मग त्यांनी तेथून पळ काढला."



“ त्यानंतर लगेच एक यहूदी याजक त्याच मार्गाने खाली चालत आला. जेंव्हा हया धार्मकि पुढार्याने पाहलिे की हा मनुष्य अर्धमेल्या अवस्थेत आहे, त्याने त्याकडे दुर्लक्ष करत पुढे नघिून गेला."



“त्यानंतर काही वेळेनंतर, एक लेवी त्याच रस्त्याने आला. (लेवी हे यहूदी धर्मातील एक गोत्र होते जे मंदरिाच्या सेवेमध्ये याजकांची मदत करत असत.) लेवीनेही त्या घायाळ व्यक्तकिडे, ज्याला मदतीची नतिांत आवश्यकता होती, दुर्लक्ष केले व आपल्या वाटेने नघिून गेला."



““त्या मागून येणारा तसिरा व्यक्त‍ि एक शोमरोनी होता. (शोमरोनी हे यहूदी वंशातील परराष्ट्रीयांशी वविाह करणारे लोक होते. शोमरोनी व यहूदी एकमेकांचा द्वेष करत असत.) परंतु हया शोमराण्याने त्या यहूदी मनुष्यास पाहलिे तेंव्हा त्याला त्याचा कळवळा आला. मग त्याने त्याची काळजी घेतली व त्याच्या जखमांवर पट्टी बांधली.”



“त्या शोमरोन्याने लगेच त्या मनुष्याला उचलून आपल्या गाढवावर बसवलि व त्याने त्याला मार्गावर असलेल्या एका उतार शाळेमध्ये आणलि व त्याची काळजी घेतली."



‘“दुसऱ्या दविशी शोमरोन्याला आपल्या कामासाठी पुढे जायचे होते. म्हणून त्याने उतारशाळेतच्या व्यवस्थापकास काही पैसे देऊन म्हटले,“याची काळजी घ्या, आणि यापेक्षा अधकि पैशांची गरज भासल्यास मी परत येताना देईन.’"



तेंव्हा येशूने त्या धर्मशास्त्राच्या पंडितास विचारले,“तूला काय वाटते? त्या तिघांपैकी अर्धमेल्या अवस्थेत असलेल्या मनुष्याचा शेजारी कोण होता?” तो उत्तरला, “ज्याने त्याजवर दया दाखवली.” येशून त्यास म्हटले,“तूही जाऊन तसेच कर.”

# 28. एक श्रीमंत तरुण अधिकारी



एके दविशी एक श्रीमंत तरुण अधकिारी येशूकडे येऊन वचिारु लागला,“उत्तम गुरुजी, सार्वकालकि जीवन मळिावे म्हणून मी काय करावे?” येशून त्यास म्हटले,“तू मला ‘उत्तम’ असे का म्हणतोस? देवाला सोडले तर कुणचि उत्तम नाही. परंतु तुला सार्वकालकि जीवन हवे आहे, तर देवाच्या आज्ञा पाळ.”



“कोणत्या आज्ञा मी पाळावयाची आवश्यकता आहे?” त्याने वचिारले. येशूने उत्तर दलिे,“खून करु नकोस. व्यभचिार करु नकोस. चोरी करु नकोस. खोटे बोलू नकोस. आपल्या आईबापाचा मान राख, आणि जिशी आपणावर तशी आपल्या शेजार्‍यावर प्रीति कर.”



परंतु त्या तरुणाने म्हटले,“हया सर्व आज्ञा मी लहानपणापासूनच पाळत आलो आहे. आता सार्वकालकि जीवनप्राप्तसिाठी मला आणखी कशाची गरज आहे?” येशूने त्याच्याकडे प्रेमाने पाहलिे.



येशूने उत्तर दलिे,“जर तू सधि्द होऊ पाहतोस, तर जा आणि तूझी सर्व मालमत्ता वकिून आलेला पैसा गोरगरीबांस दान कर, आणि तुला स्वर्गामध्ये सर्व संपत्ती मळिेल. मग तू ये आणि माझ्यामागे चालू लाग.”



येशूचे हे बोलणे ऐकून तो तरुण खूप नरिाश झाला, कारण तो खूप श्रीमंत होता व आपली संपत्ती दुसर्यांस देऊ इच्छित नव्हता. तो येशूपासून नघिून आपल्या घरी परतला.



मग येशू आपल्या शष्यिांस म्हणाला,“श्रीमंतांना स्वर्गाच्या राज्यात जाणे कती कठणि आहे! होय, श्रीमंताला स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करण्यापेक्षा ऊंटाला सुईच्या नेढयातून जाणे सहज शक्य आहे.”



जेंव्हा शष्यिांनी हे ऐकले तेंव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला व ते म्हणाले, “तर मग कोणाचा नभिाव लागणार?”



येशूने शष्यिांकडे पाहून म्हटले,“मनुष्यांस हे कठणि आहे, परंतु देव सव्र काही साध्य करण्यास समर्थ आहे.”



पेत्र येशूला म्हणाला, “आम्ही सर्व सोडून तुझ्या पाठमिागे आलो आहोत. याचा मोबदला आम्हास काय मळिणार?”



येशूने उत्तर दलिे,“ज्यांनी माझ्यासाठी घरे, भाऊ, बहनिी, माता, पति, लेकरे व संपत्ति सोडली आहे, त्यांना ती 100 पटीने जास्त मळिणार आहे व त्याजबरोबर सार्वकालकि जीवनाचे वतन मळिणार आहे. परंतु पहलिे ते शेवटले व शेवटले ते पहलिे असे पुष्कळांचे होईल.”

# 29. कृतघ्न चाकराचा दृष्टान्त



एके दविशी पेत्राने येशूला वखिरले,“गुरुजी, जेंव्हा माझा भाऊ मजवरिुध्द अपराध करील तेव्हा मी त्यास कति वेळा क्षमा करावी?” सात वेळा?” येशूने म्हटले,“सात वेळा नव्हे, तर साताच्या सत्तर वेळा!” यावरुन, येशूचा अर्थ होता की, आपण नेहमी क्षमा करावी. तेंव्हा येशूने हा दृष्टांन्त सांगतिला.



येशू म्हणाला,“स्वर्गाचे राज्य एका राजासारखे आहे. जो आपल्या चाकरांकडून त्यांच्या पैशाचा हशिब घेतो. त्याच्या चाकराकडे 200,000 वर्षांचे वेतनाइतके कर्ज होते."



“हा चाकर कर्ज फेडू शकत नसल्यामुळे राजाने म्हटले की, हया मनुष्यास व त्याच्या कुटुंबास गुलाम म्हणून विकून टाका म्हणजे त्याचे कर्ज फिटेन.”



“तो चाकर राजासमोर आपल्या गुडघ्यांवर येऊन विनवनी करु लागला, कृपया माझ्यावर दया करा व मला कही वेळ द्या, म्हणजे मी तुमचे सर्व कर्ज फेडनि.” राजाला त्या दासाची दया आली व त्याने त्याला त्याचे सर्व कर्ज माफ केले व घरी पाठविले.”



“ परंतु हा दास घरी जात असताना त्याला त्याचा एक मित्र सापडला ज्याच्याकडून त्याला सुमारे चार महिन्यांच्या वेतनाइतके कर्ज वसूल करावयाचे होते. त्या दासाने आपल्या मित्राची कॉलर पकडली आणि म्हणाला,‘आताच्या आता माझे घेतलेले कर्ज मला दे!’"



“त्याचा मित्र गुडघ्यावर येऊन विनवणी करु लागला,“मला थोडा समय द्या व माझ्यावर कृपा करा, म्हणजे मी तुमचे सर्व कर्ज फेडिन.” परंतु त्याऐवजी, त्या दासाने आपल्या मित्रास सर्व कर्जाची फेड होईपर्यंत तुरुंगात डांबून ठेवले.”



“दुसऱ्या काही चाकरांनी हे पाहिले असता त्यांना फार वाईट वाटले. त्यांनी राजाकडे जाऊन सर्व हकगित सांगतिली.”



राजाने त्या दासास बोलावून घेतले व म्हटले,‘अरे दुष्ट दासा! तू गयावया केल्यामुळे मी ते सर्व देणे तुला सोडलि होते. तशी तूही आपल्या सोबतीच्या दासावर दया करावयास पाहजि होती.’ राजाला त्याचा खूप राग आला व त्याने त्याचे सर्व देणे फेडीपर्यंत त्याला हालहाल करणाऱ्यांच्या हाती दलि.”



तेंव्हा येशू म्हणाला,“जर तुम्ही प्रत्येक जण आपआपल्या बंधूला मनापासून क्षमा करणार नाही तर माझा स्वर्गातील पिताही त्याप्रमाणेच तुमचे करील.”

# 30. येशू पाच हजारांना भोजन देतो



येशूने आपल्या शिष्यांना अनेक ठिकाणी लोकांना शिकविण देण्यासाठी पाठविले. जेंव्हा ते येशूकडे पुन्हा आले, तेंव्हा त्यांनी आपण केलेली सर्व कार्ये येशूला सांगितिले. तेंव्हा येशूने त्यांना तळयाच्या पलकिडे शांत ठिकाणी काही वेळ विश्रांती घेण्यासाठी त्याच्याबरोबर बोलाविले. म्हणून त्यांनी बोटीमध्ये प्रवेश केला व तळयाच्या पलकिडे पोहोचले.



परंतु त्या ठिकाणी येशू व शिष्यांना पाहून मोठा जनसमुदाय त्यांच्यासमोर आला. हा जनसमुदाय त्यांच्या अगोदर तळयाच्या पलकिडे पोहचण्यासाठी धावला. यास्तव येशू व शिष्य त्या ठिकाणी पोहचण्यापूर्वीच एक मोठा जनसमुदाय त्यांची प्रतिक्षा करत होता.



त्या जनसमुदायामध्ये सुमारे 5000 पुरुष होते, स्त्रिया व मुले वेगळीच होती. येशूला त्यांचा कळवळा आला. येशूला हा समुदाय मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखा दिसून आला. तेंव्हा तो त्यांना शिकवू लागला व त्यामध्ये असणाऱ्या आजाऱ्यांना बरे करु लागला.



दुपारी उशीराने शिष्यांनी येशूकडे जाऊन सांगितिले,"खूप उशिर झाला आहे आणि येथे जवळपास गाव नाही. तेंव्हा आपण लोकांना पाठवून द्या म्हणजे ते आपणांसाठी भाकरी विकत घेतील."



परंतू येशूने शष्यिांस म्हटले,“तूम्ही त्यांना काहीतरी खावयास द्या!” ते उत्तरले,“आम्ही कसे काय एवढया मोठया समुदायास जेवण देऊ शकतो? आम्हाकडे केवळ पाच भाकरी व दोन मासळी आहेत.”



येशूने शष्यिांस सांगतिले की, त्यांनी लोकांस हरविळीवर पंक्त धिरुन बसवावे. पन्नास - पन्नास लोकांच्या रांगा बनवाव्यात.



मग येशूने त्या पाच भाकरी व दोन मासळी घेऊन वरती आकाशाकडे पहिले व त्या अन्नाबद्दल देवाचा धन्यवाद केला.



मग येशून त्या भाकरी व मासळीचे तुकडे केले. मग त्याने शिष्यांस लोकांना वाढण्यासाठी दिले. शिष्यांनी ते लोकांना दिले व ते अन्न कधिच संपले नाही! सर्व लोक जेवून तृप्त झाले.



त्यानंतर शिष्यांनी उरलेल्या भाकरी व मासळीचे तुकडे गोळा केले व ते बारा टोपल्या भरली! हे सर्व भोजन केवळ पाच भाकरी व दोन मासळयांतूनच पुरविले गेले.

*A Bible story from:* मत्तय *14:13−21;* मार्क *6:31−44;* लूक *9:10−17; John 6:5−15*

# 31. येशू पाण्यावर चालतो



तेंव्हा लोकांना घरी पाठवून देत असतांना येशूने शिष्यांना होडीमध्ये बसून पैलतिरीकडे जाण्यास सांगितले. सर्व लोक निघून गेल्यानंतर येशू डोंगरावर प्रार्थनेसाठी गेला. येशू त्या ठिकाणी अगदी एकटाच होता, आणि तो रात्री खूप उशिरापर्यंत प्रार्थना करत राहिला.



दरम्यान, शिष्य बोट वल्हवत-वल्हवत तळयाच्या मध्यभागी येऊन ठेवले होते. वारा विरुध्द दिशेने जोरात वहात असल्यामुळे त्यांना बोट वल्हवतांना खूप त्रास होत होता.



तेंव्हा येशू प्रार्थना संपवून शष्यिांकडे आला. तो पाण्यावर चालत त्यांच्या बोटीकडे येत होता!



येशूला पाहून शष्यि खूप घाबरले, कारण त्यांना वाटले की कोणी भूत त्यांच्याकडे येत आहे. येशूला ठाऊक होते की, ते घाबरले आहेत म्हणून तो त्यांना म्हणाला,“भऊि नका.” मीच आहे!”



तेंव्हा पेत्र येशूला म्हणला,“गुरुजी, जर आपण आहात तर मला पाण्यावर चालण्याची आज्ञा द्या.” येशूने पेत्रास म्हटले,“ये!”



यास्तव पेत्र नावेतून उतरुन येशूकडे पाण्यावर चालू लागला. परंतू थोडे अंतर चालल्यानंतर त्याची दृष्टि येशूवरुन हटून लाटांकडे गेली.



तेंव्हा पेत्राला भर्ती वाटू लागली व तो पाण्यामध्ये बुडू लागला. तो मोठयाने ओरडला,“स्वामी, मला वाचवा!” येशूने लगेच त्याच्याकडे धाव घेऊन त्याला वाचवलि. मग तो पेत्रास म्हणाला,“अरे अल्पवश्‍िवासू माणसा, तू संदेह का केलास?”



जेंव्हा पेत्रा आणयिेशू दोघे नावेमध्ये चढले, तेंव्हा लगेच वारा थांबला आणपािणी शांत झाले. हे पाहून शष्यिांना मोठे आश्‍चर्य वाटले. त्यांनी येशूला नमन केले व म्हणाले,“तू खरोखर देवाचा पूत्र आहेस.”

बायबल कथा: मत्तय *14 : 22 – 33;* मार्क *6 : 45 – 52;* योहान *6 : 16 – 21*

# 32. येशू एका दृष्टात्मागग्रस्त मनुष्यास व आजारी स्त्रीस बरे करितो



एके दिवशी, येशू आणि त्याचे शिष्य नावे मध्ये बसून सरोवराच्या पलिकडे गरसेकर राहात असलेल्या प्रदेशात गेले.



सरोवराच्या पलिकडे जाताच एक दृष्टात्माग्रस्त मनुष्य येशूकडे धावत आला.



हा मनुष्य एवढा शक्तशिाली होता की कोणीही मनुष्य त्याला नयिंत्रीत करु शकत नव्हता. लोक त्यास साखळदंडांनी व बेडयांनी बांधत, परंतू त्या तो लगेच तोडत असे.



तो मनुष्य कब्रस्थानामध्ये रहात असे. तो रात्रंदविस मोठयाने कंचािळत असे. तो अंगावर कपडे घालत नसे व आपले अंग दगडांनी ठेचून घेत असे.



जेंव्हा तो मनुष्य येशूकडे आला, तेंव्हा तो येशूसमोर आपल्या गुडघ्यावर आला. येशू त्या दृष्टात्म्यास म्हणाला,"हया मनुष्यातून बाहेर नघि!"



दृष्टात्माग्रस्त मनुष्य मोठयाने ओरडला,"परात्पर देवाच्या पुत्रा येशू, तू मध्ये का पडतोस?" कृपया मला कष्ट देऊ नकोस !" तेंव्हा येशूने दृष्टात्म्यास वचिारले,"तूझे नाव काय आहे?" तो उत्तरला,"माझे नाव सैन्य (लेगोन) आहे, कारण आम्ही पुष्कळ आहोत." ("लेगोन" हा रोमी सेनेतील हजारो सैनकिांचा ग्रुप होता)



ते दृष्टात्मे येशूला वनिवणी करु लागले, “कृपया आम्हाला या प्रान्तातून घालवून देऊ नका!” शेजारच्या टेकडीवर डुकरांचा एक कळप चरत होता. म्हणून, दृष्टात्म्यांनी वनिंती केली, “कृपया आम्हास डुकरांमध्ये पाठवा!” येशू म्हणाला, “जा!”



तेंव्हा दृष्टात्मे त्या माणसामधून नघिून डुकरामध्ये घूसले. तेंव्हा ती डुकरे कडयावरुन खाली समुद्रामध्ये बुडून मेली. त्या कळपामध्ये सुमारे 2000 डुकरे होती.



हे पाहून डुकरे राखणारे धावत नगरामध्ये गेले व त्यांनी झालेला समाचार लोकांना सांगतिला. तेंव्हा नगरातील लोकांनी येऊन त्या दृष्टात्माग्रस्त मनुष्यास पाहलि. तो शांत बसलेला, अंगावर कपडे घातलेला व एक नरिोगी असा त्यांनी त्याला पाहलिा.



हे पाहून लोक फार भयभति झाले व त्यांनी येशूला त्यांचा प्रान्त सोडून जाण्यास सांगतिले. तेंव्हा येशू मचव्यात बसून जाण्यासाठी तयार झाला. पूर्वी दृष्टात्मा असलेला मनुष्य येशूच्या बरोबर जाण्यासाठी वणिवणी करु लागला.



परंतू येशू त्यास म्हणाला,"नाही, तू आपल्या घरी जा व आपल्या मित्रांस व कुटुंबयिांस सांग की देवाने तुझ्यावर केवढी मोठी दया दाखवलिी आहे."



तेंव्हा तो मनुष्य आपल्या घरी गेला व देवाने त्याच्या साठी काय केले आहे याची साक्ष त्याने दलिी. हे ऐकणारा प्रत्येकजण आश्चर्याने थक्क झाला.



येशू सरोवराच्या पलकिडे परतला. तो तेथे पोहोचताच लोकांनी त्याच्याभोवती मोठी गर्दी केली. त्या समुदायामध्ये बारा वर्षापासून रक्तश्राव होत असलेली एक स्त्री होती. तनिे सर्व पैसा डॉक्टरांना दलिा पण तरीही ती बरी झाली नाही, तर तर्चिी परस्थिती आणखी वाईट झाली.



तनिे ऐकले होते की येशूने अनेक रोग्यांना आरोग्य दलिे आहे आणि ती म्हणाली,“मला खात्री आहे की, जर मी येशूच्या वस्त्राला स्पर्श केला, तरीही बरी होईल!” म्हणून तीने पुढे जाऊन येशूच्या वस्त्रांस स्पर्श केला. तनिे स्पर्श करताचा तीचा रक्तश्राव थांबला!



येशूला लगेच कळले की त्याच्या शरीरामधून शक्ती गेली आहे. म्हणून त्याने मागे वळून पाहिले व म्हटले,“मला कोणी स्पर्श केला?” शिष्यांनी उत्तर दिले,“लोकांची एवढी गर्दी तुमच्याभोवती आहे. तर तूम्ही असे का विचारले,“मला कोणी स्पर्श केला?”



त्या स्त्रिने भित-भित जाऊन येशूपुढे गुढगे टेकले. मग तिने काय केले व ती कशी बरी झाली ते सांगितले. येशूने तिला म्हटले,“तुझ्या विश्वासाने तू बरी झालीस. शांतीने जा.”

बायबल कथा: मत्तय *8: 28 – 34; 9 : 20 – 22;* मार्क *5 : 1 – 20; 5 : 24b – 34;* लूक *8 : 26 – 39; 8 : 42b – 48*

# 33. ‎पेरणी करणाऱ्याचा दृष्टांत



एके दविशी समुद्रकनिार्‍याजवळ येशू एका मोठया जनसमुदायास शकिवण देत होता. तेंव्हा येशू एका मचव्यात चढून पाण्यामध्ये थोडा आत गेला, अशासाठी की ऐकणार्‍यांना नटि ऐकू जावे. तो मचव्यात बसून लोकांना शकिवू लागला.



येशूने त्यांना ही गोष्ट सांगतिली. “एक शेतकरी पेरणी करावयास नघािला. तो हाताने पेरणी करत असतांना, काही बजि वाटेवर पडले आणि आकाशातील पक्षांनी येऊन ते खाऊन टाकले.



“काही बीज खडकाळीवर पडले, त्या ठकिाणी खूपच कमी माती होती. खडकाळीवरील बीजास लगेच अंकुर फुटला, पंरतु जमनि नसल्यामुळे त्याची मुळे खोलवर जाऊ शकली नाहीत. जेंव्हा सूर्याची तेज करिणे त्यावर आली, तेंव्हा ते करपली.”



“आणखी काही बीज काटेरी झूडपांमध्ये पडले. ते बीज वाढू लागले, परंतू काटयांनी त्याची वाढ खुंटविली. म्हणून काटेरी भूममिध्ये पडलेल्या बीजाची वाढ होऊ शकली नाही व त्यास फळ आले नाही.”



“उरलेले बीज सुपकि भूममिध्ये पडले. त्यांना कुठे 30, कुठे 60 तर कुठे 100 पट फळ मळिाले. ज्याला ऐकावयास कान आहेत तो ऐको!”



हया दृष्टान्ताचा अर्थ शषि्यांना समजला नाही. म्हणून येशूने स्पष्टकिरण केले,“बीज हे देवाचे वचन आहे. वाटेरी भूमि म्हणजे जो देवाचे वचन ऐकतो पण समजून घेत नाही आणि सैतान येऊन ते मनातून काढून टाकतो.”



“खडकाळी वरील बीज म्हणजे जो देवाचे वचन ऐकून लगेच ग्रहण करतो. परंतू कष्ट व छळ झाल्यानंतर वसिरुन जातो.”



“काटेरी भूमतिील बीज म्हणजे जो देवाचे वचन ऐकतो परंतू कालांतराने जेंव्हा संसाराची चंता, श्रीमंती आणि जगकि सुख हे त्याच्या डोक्यामध्ये घर करु लागतात व त्याचे देवावरील प्रेम कमी होत जाते. परणािमत:, त्याने ऐकलेले वचन नष्फिळ ठरते.”



“परंतू सुपकि जमनि म्हणजे जो व्यक्ती देवाचे वचन ऐकून त्याजवर वश्विास ठेवतो, आणि त्यानुसार चालतो तोच फलवंत ठरतो.”

बायबल कथा*: मत्तय  13 :1 –8; 18–23;* मार्क  *4 : 1 – 8 ; 13 – 20;* लूक  *8 : 4 – 15*

# 34. येशू अनेक दृष्टांत शकिवतो



येशूने स्वर्गाच्या राजावषियी अनेक गोष्टी सांगतिल्या. उदाहरणार्थ, तो म्हणाला, “स्वर्गाचे राज्य मोहरचि्या दाण्यासारखे आहे जे एका शेतकर्‍याने पेरलि. तूम्हास ठाऊक आहे की मोहरीचा दाणा हा सर्व बीजांमध्ये अगदी लहान आहे.”



परंतू जेंव्हा हा मोहरीचा दाणा उगवतो व त्याची पूर्ण वाढ होते, तेंव्हा बागेतील इतर झुडपांपेक्षा ते अधकि वाढते की, आकाशातील पक्षीही येऊन त्यांवर बसतात.”



येशून आणखी एक गोष्ट सांगतिली,“स्वर्गाचे राज्य खमीरासारखे आहे जे एका स्त्रीने पठिामध्ये घातले व संपूर्ण पठिाचा गोळा खमीर झाले.”



“स्वर्गाचे राज्य शेतामध्ये लपवून ठेवलेल्या गुप्त खजन्यिासारखे आहे. दूसर्‍या एका मनुष्यास ते सापडले व त्याने ते पुन्हा लपवलि. त्याला एवढा आनंद झाला की त्याने आपली सर्व संपत्ती वकिून आलेल्या पैशांनी ते शेत वकित घेतले.



“देवाचे राज्य आणखी एका अनमोल मोत्यासारखे आहे. जेंव्हा मोत्याच्या व्यापाऱ्यास ते दृष्टसि पडले, तेंव्हा त्याने त्याची सर्व मालमत्ता वकिून टाकली व आलेल्या पैशंनी ते मौल्यवान रत्न वकित घेतले.”



तेंव्हा येशून अशा लोकांस धडा शकिवण्यिासाठी एक गोष्ट सांगतिली जे स्वत:स चांगले समजत व दूसऱ्यांची नदिा करत असत. तो म्हणाला, “दोन मनुष्य प्रार्थना करण्यासाठी मंदरिात गेले. त्यांपैकी एक जकातदार व दूसरा एक धार्मकि पुढारी होता.”



धार्मकि पुढार्याने अशी प्रार्थना केली,“हे देवा, मी तुला धन्यवाद देतो की मी अन्य मनुष्यांसारखा पापी नाही. चोरी, व्यभचिार व कोणाचे वाईट करत नाही, व हया जकातदारासारखाही नाही.



“उदाहरणार्थ, मी आठवडयातून दोनदा उपवास करतिो आणि आपल्या सव्र उत्पन्नाचा दशांस देतो.”



“परन्तु तो जकातदार त्या धार्मिक पुढाऱ्यापासून फार दूर उभा होता आणि वर स्वर्गाकडे पाहण्याची त्याला हिम्मत नव्हती. त्याऐवजी, त्याने आपल्या हातांनी छाती बडवून घेतली आणि प्रार्थना केली,“देवा, मज पाप्यावर दया कर.”



तेंव्हा येशू म्हणाला,“मी तुम्हाला खचित सांगतो, देवाने त्या जकातदाराची प्रार्थना ऐकून त्यास नीतिमान ठरविले. परंतू त्याने धार्मिक पुढाऱ्याची प्रार्थना ऐकली नाही. जो स्वत:ला उंच करु पाहतो त्याला देव नीच करील, व जो स्वत:ला नम्र बनवितो त्याला देव उंचावील.”

बायबल कथा: मत्तय *13 : 31 – 33,44 – 46;* मार्क *4 : 30 – 32;* लूक *13 : 18 – 21; 18 : 19 – 14*

# 35. दयाळू पित्याचा दृष्टान्त



एके दविशी जमलेल्या अनेक जकातदार व पापी लोकांस येशू शकिवण देत होता.



काही धार्मकि पुढारीही त्या ठकिाणी होते व येशू पापी लोक व जकातदार यांच्यावरही त्यांप्रमाणेच प्रेम करत असल्यामुळे तक्रार करु लागले. तेंव्हा येशून त्यांना ही गोष्ट सांगतिली.



“एका मनुष्यास दोन पुत्र होते. धाकटया पुत्राने त्याकडे जाऊन म्हटले,“बापा, माझ्या वाटयाला येणारी मालमत्ता मला द्या” यास्तव पत्याने आपल्या संपत्तीचे दोन वाटे कले.



“लवकरच धाकटा मुलगा सर्व मालमत्ता घेऊन दूरदेशी नघून गेला आण तिथे वाईट मार्गानी ती संपवून टाकली.”



“त्यानंतर, तो राहात असलेल्या जागी भयंकर दुष्काळ पडला व त्यास अन्न खरेदी करण्यास त्याच्याजवळ पैसे उरले नाहीत. तेंव्हा त्याला एका शेतामध्ये डुकरे चारण्याचे काम मळिाले तो एवढा भूकेलेला होता की डुकरे खात असलेल्या शेंगा खाऊ की काय असे त्याला वाटले.



“शेवटी तो धाकटा पुत्र स्वत:ला म्हणाला,“मी येथे काय करतोय?” माझ्या पत्रियाच्या घरामध्ये नोकरचाकारांची खाण्याची चंगळ आहे, आणि मी येथे उपाशी मरतोय. मी आपल्या पत्रियाकडे परत जाईल आणि त्याचा एक चाकर म्हणून राहण्यास वनिंती करील.”



“अशा प्रकारे तो धाकटा पुत्र आपल्या पित्याच्या घराकडे जाण्यास निघाला. तो दूर असतानाच पित्याने त्यास ओळखले व त्याला त्याची दया आली. त्याने धावत जाऊन त्यास मिठी मारली व त्याचे मुके घेतले.”



“पुत्र म्हणाला, “हे बापा, मी देवाविरुध्द व आपणाविरुध्द पाप केले आहे. मी आपला पुत्र म्हणविण्यास लायक नाही.”



“परंतू त्याच्या पित्याने एका चाकरास बोलावून म्हटले,‘त्वरा कर आणि माझ्या पुत्रास उत्तम वस्त्रे घेऊन त्याच्या अंगावर घाला. त्याच्या हातामध्ये अंगठी व पायामध्ये जोडे घाला. मग एक दृष्टपुष्ट वासरु मारुन एक मेजवानी तयार करा व आपण सगळे आनंद साजरा करु, कारण माझा हा मुलगा मेला होता, पण आता जविंत झाला आहे! तो हरवला होता, पण आता सापडला आहे!”



“अशाप्रकारे त्यांनी आनंदोत्सव सुरु केला. त्याअगोदर, थोरला मुलगा शेतामध्ये काम करुन घरी आला होता. संगति व नृत्याचा आवाज ऐकून त्याला आश्चर्याचा धक्का बसला.



“जेंव्हा थोरल्या पुत्रास कळले की त्याचा घाकटा भाऊ घरी आला आहे, तेंव्हा तो आत जाईना. तेंव्हा त्याचा पिता बाहेर येऊन त्यास आत येण्यासाठी व आनंदामध्ये सहभागी होण्यासाठी विनंती करु लागलाप परंतू त्याने आत जाण्यास नकार दिला.



थोरला पुत्र आपल्या पित्यास म्हणाला,“एवढी वर्षे मी तुम्हासाठी काम करत आह व विश्वासू राहिलो आहे! मी तूमच्या आज्ञेच्या पलकिडे काहीही केले नाही, तरहिी तुम्ही माझ्या मित्रांसोबत आनंद करण्यासाठी एक लहानसे करडूही दिले नाही. परंतू तुमचा हा पुत्र आपली सारी मालमत्ता वाईट मार्गाने नष्ट करुन घरी परतल्यावर आपण त्याच्यासाठी एक हष्टपुष्ट वासरु मारुन ही मेजवानी दिली आहे!”



‘पित्याने उत्तर दलि,“माझ्या मुला, तू नेहमीच माझ्या सोबत आहेस, आणि माझे जे काही आहे, हे सर्व तुझेच आहे. परंतू आता आपण आनंद करणे योग्य आहे, कारण तुझा हा भाऊ मेला होता, पण आता जविंत झाला आहे. तो हरवला होता, पण आता सापडला आहे!”

बायबल कथा*: Luke 15:11–32*

# 36. प्येशूचे रुपांतर



एके दविशी येशूने आपल्या शष्यिांपैकी पेत्र, याकोबा व योहान हया तघिांना त्यांच्या बरोबर घेतले. हा योहान बाप्तस्मिा करणारा योहान नव्हे) ते सर्व उंच डोंगरावर प्रार्थना करण्यासाठी चढून गेले.



येशू प्रार्थना करत असतांना अचानक त्याचा चेहरा सूर्यासारखा चमकू लागला आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी शुभ्र दसिू लागली.



तेंव्हा मोशे व संदेष्टा एलयिा हे त्या ठकािणी प्रकट झाले. ही माणसे शेकडो वर्षापूर्वी पृथ्वीवर होऊन गेली होती. त्यांनी येशूच्या पृथ्वीवरील यरुशलेमेमध्ये होणार्या मृत्यूवषियी घोषणा केल्या होत्या.



मोशे व एलयिा येशूबरोबर संभाषण करत असताना, पेत्र येशूला म्हणला,“आम्ही येथेच राहावे हे बरे आहे, येथे आपण तीन तंबू बववू या. एक मोशेसाठी, एक एलयिासाठी व एक आपणासाठी पेत्रे काय बोलत होता हयाचे त्याला भान नव्हते.



पेत्र बोलत असतानाच एक शुभ्र मेघाने येउन त्यांना वेढलिे व वरुन स्वर्गातून आकाशवाणी झाली,"हा माझा परमप्रयि पुत्र आहे. मी याजवषियी संतुष्ट आहे. त्याचे तुम्ही ऐका" ते तनि्ही शषि्य खूप भयभति झाले व भूमविर खाली पडले.



तेंव्हा येशूने त्यांना स्परश करुन म्हटले,"भऊि नका. चला उठा." जेंव्हा ते उठले तेंव्हा येशूला सोडून सभोवताली त्यांना इतर कोणी दसिले नाही.



येशू आणि ते तीन शिष्य पुन्हा पर्वताच्या खाली उतरले. तेंव्हा येशू त्यांना म्हणाला की यावषियी कोणाला काही सांगू नका. मी लवकरच मरेल व पुन्हा जविंत होईल. त्यानंतर तुम्ही यावषियी लोकांना सांगू शकता."

बायबल कथा*: मत्तय  17:19;* मार्क  *9 : 2 – 8;* लूक  *9 : 28 – 36*

# 37. येशू लाझारास जिवंत करितो



एके दविशी लाजर खूप आजारी असल्याची बातमी येशूला कळली लाजर व त्याच्या दोन बहनिी मार्था व मारयिा ही येशू चे जवळचे मति्र होते. जेव्हा येशूने ही बातमी ऐकली तेंव्हा तो म्हणाला,“हया आजाराचा अन्त मृत्यू नाही, तर हा आजार देवाच्या गौरवासाठी आहे.” येशू आपल्या मति्रांवर प्रेम करत होता, परंतू तो असलेल्या ठकिाणी तो आणखी दोन दविस राहलिा



दोन दविसानंतर, येशू आपल्या शष्यिांना म्हणाला,“आपण यहूदयिामध्ये परत जाऊ”. “परंतू स्वामी” शष्यिांनी उत्तर दलिे,“थोडया वेळापूर्वीच तेथील लोक आपणास मारावयास टपले होते!” येशू म्हणाला,“आपला मति्र लाजर हा झोपलेला आहे, मी त्याला उठवणे अगत्याचे आहे.”



येशूच्या शिष्यांनी उत्तर दिले,"स्वामी, जर लाजर झोपलेला आहे तर तो बरा होईल." तेंव्हा येशूने त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले,"लाजर मेला आहे. आणि मी तेथे नव्हतो म्हणून मला तुमच्यासाठी आनंद वाटतो. की तुम्ही मजवर विश्वास ठेवावा."



जेंव्हा येशू लाजर राहत असलेल्या गावी आला, तेंव्हा लाजरला मरुन चार दिवस झाले होते. मार्था येशूला भेटण्यासाठी पुढे गेली आणि म्हणाली,"स्वामी, जर आपण इथे असता, तर माझा भाऊ गेला नसता. परंतु माझा विश्वास आहे की आपण जे काही मागाल, देव ते पूर्ण करील.



येशू म्हणाला, “पुनरुत्थान व जीवन मीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवणारा मेला असला तरी जगेल. आणि जो मजवर विश्वास ठेवितो तो कधीही मरणार नाही. याजवर तू विश्वास ठेवतोस काय?” मार्थाने उत्तर दिले,“होय,स्वामी! आपण देवाचे पुत्र मसीहा आहात असा मी विश्वास धरिते”



तेंव्हा मारिया तेथे आली. तिने येशूच्या पायावर पडून म्हटले,“स्वामी, तुम्ही येथे असतात, तर माझा भाऊ मेला नसता.” येशून विचारले,“तुम्ही लाजारला कोठे ठेविले आहे?” त्यांनी म्हटले ,“कबरेमध्ये. या आणि पाहा.” तेंव्हा येशू रडला.



ती खडकामध्ये खोदलेली कबर होती व तिच्या दाराशी धोंडा ठेवण्यात आला होता. कबरेपाशी येऊन येशू त्यांना म्हणाला, “धोंडा बाजूला सारा.” परंतू मार्थ म्हणाली,“त्याला मरुन चार दिवस झाले आहेत. आता त्याला दुर्गंधी येत असेल.”



येशूने उत्तर दिले,“तू विश्वास ठेवशील तर देवाचे गौरव पाहशील असे मी तुला सांगितले नव्हते काय?” मग त्यांनी ती धोंड काढली.



तेव्हा येशूने वर स्वर्गाकडे पाहून म्हटले,“बापा, तू माझे ऐकले म्हणून मी तुझे आभार मानतो. मला ठाऊक आहे, की तू सर्वदा माझे ऐकतोस, परंतू जो लोकसमुदाय सभोवती उभा आहे त्याच्याकरिता मी बोलला; हयासाठी की, तू मला पाठविले आहे असा त्यांनी वशि्वास धरावा.” मग येशूने मोठयाने हाक मारली,“लाजरा, बाहेर ये!”



तेंव्हा तो लाजरा बाहेर आला! त्याचे हातपाय प्रेतवस्त्रांनी बांधलेले होते. येशूने त्यांना सांगितिले,“हयाला मोकळे करुन जाऊ द्या!” हा चमत्कार पाहून अनेक यहूद्यांनी येशूवर वशि्वास ठेवलिा.



परंतु यहूद्यांचे धार्मकि पुढारी येशूचा द्वेश करु लागले, व येशू आणि लाजर यांनी जीवे मारण्यासाठी योजना आखू लागले.

:

# 38. येशूला धरुन देण्यात येते



दरवर्षी यहूदी वल्हांडण सण साजरा करत. देवाने मसिर देशातील गुलामगरीतून त्यांची कशाप्रकारे सुटका केली, याचे स्मरणार्थ यहूदी लोक हा सण पाळतात. येशूच्या प्रचारकार्यास आरंभ होऊन सुमारे तीन वर्षांनंतर येशूने आपल्या शष्यिांस सांगतिले की त्यांजबरोबर वल्हांडण साजरा करावा अशी त्याची इच्छा आहे, आणि त्यानंतर तो मरणार आहे असेही त्याने सांगतिले.



येशूच्या शष्यिांपैकी यहूदा नावाचा एक शष्यि होता. यहूदा हा पैशाची थैली सांभाळणारा खजनिदार होता, पण तो पैशाचा लोभी असल्यामुळे अनेकदा त्यातून पैसे चोरत असे. येशू आणि शष्यि यरुशलेममध्ये आल्यानंतर यहूदा धार्मकि पुढाऱ्यांना जाऊन भेटतो व येशूला पकडून देण्याविषयी सांगतो तेंव्हा ते त्यास काही पैसे देण्यास तयार झाले. त्याला ठाऊक होते की यहूदी पुढारी मसीहास नाकारत होते व त्यास मारण्याचा कट रचत होते.



तेंव्हा महायाजक व यहूदी पुढाऱ्यांनी मळिून यहूदाला चांदिचे तीस नाणी मोबदला देण्याचे ठरवलिे. भवष्यिवाणी पूर्ण होण्यासाठी हे सर्व काही झाले. यहूदा त्यांच्याशी सहमत झाला व पैसे घेऊन तो नघिाला. तेंव्हापासून तो येशूला धरुन देण्याची वाट पाहू लागला.



यरुशलेमध्ये येशूने आपल्या शष्यिांसह वल्हांडण सण साजरा केला. वल्हांडण सणादरम्यान येशूने भाकर घेऊन ती मोडलिी. तो म्हणाला,"घ्या आणि खा." हे माझे शरीर आहे ते तुम्हासाठी दलिे जात आहे. माझ्या स्मरणार्थ हे करा." त्याचप्रकारे येशूने म्हटले की त्याचे शरीर त्यांच्यासाठी बलदिान म्हणून देण्यात येईल.



मग येशून एक प्याला घेऊन म्हटले,"प्या. हा प्याला माझ्या रक्तात झालेला नवा करार आहे. माझे रक्त अनेकांच्या पापक्षमेसाठी ओतले जात आहे. जेंव्हा-जेंव्हा तुम्ही हे कराल, माझ्या स्मरणार्थ हे करा."



तेंव्हा येशू शष्यिांना म्हणाला,"तुम्हापैकी एक मला धरुन देईल." तेंव्हा ते आश्चर्याने पाहू लागले की अशी गोष्ट कोण करील. येशू म्हणला,"त्याला मी ही भाकर मोडून देईल, तोच माझा वश्विासघात करील." तेंव्हा त्याने यहूदास ती भाकर मोडून दलिी.



यहूदाने भाकर घेतल्याबरोबर सैतानाने त्याच्यामध्ये प्रवेश केला. यहूदा तेथून निघून यहूदी पुढाऱ्यांच्या मदतीस येशूला पकडण्यासाठी गेला. तो रात्रीचा समय होता.



भोजनानंतर, येशू आपल्या शिष्यांसोबत जैतुनाच्या डोंगराकडे जात होता. येशू म्हणाला,"आज रात्री तुम्ही सर्व मला सोडून जाल. असे लिहिले आहे, मी मेंढपाळास मारील व मेंढरांची दाणादाण करील."



पेत्राने उत्तर दिले,“जरी सर्वांनी तुला सोडिले, तरी मी तुला सोडणार नाही!” तेंव्हा येशू पेत्रास म्हणाला,“सैतानाने तुम्हा सर्वांचा नाश करायचे ठरविले आहे, परंतू मी तुम्हासाठी प्रार्थना केली आहे, पेत्रा, अशासाठी की तुमचा विश्वास डळमळू नये. तरीदेखिल आज रात्री, कोबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील.”



तेव्हा पेत्र येशूला म्हणला, “मला मरावे जरी लागले, तरी मी तुला नाकारणार नाही!” बाकी शिष्यांनीही तसेच म्हटले.



मग येशू आपल्या शष्यिांना घेऊन गेथशेमानी येथील बागेत गेला. शष्यिांनी परक्षिेत पडू नये म्हणून येशूने त्यांना प्रार्थना करावयास सांगतिले. मग येशू स्वत: प्रार्थना करावयास गेला.



येशूने तीन वेळा प्रार्थना केली,"हे पत्यिा, जर शक्य असेल तर हा दु:खाचा प्याला माझ्यापासून दूर कर. परंतु लोकांच्या पापक्षमेसाठी दुसरा मार्गच नसेल, तर तुझी इच्छा पूर्ण होवो." येशू खूप व्याकूळ झाला व त्याला रक्ताचा घाम आला. देवाने एक देवदूत पाठवून त्यास सामर्थ्य दलिे.



प्रत्येक प्रार्थना संपवून येशू शष्यिांकडे आलेला असतांना शष्यि झोपलेल्या अवस्थेत त्याला आढळले. जेंव्हा तो तसिर्यांदा परतला तेंव्हा येशू म्हणाला,“उठा!” मलk धरुन देणारा आला आहे.”



यहूदा धार्मकि पुढार्यांसह, सैनकिांसह एक मोठया लोकसमुदायांसह आला. त्यांनी आपणाबरोबर तलवारी व भाले आणलिे होते. यहूदा येशूजवळ येऊन म्हणाला,“नमस्कार, स्वामी,” आणि त्याने त्याचे चुंबन घेतले. येशूला पकडण्यासाठी यहूदी धर्मपुढार्यांसाठी हे एक चन्हि होते. तेंव्हा येशू म्हणाला,“यहूदा, माझे चुंबन घेऊन तु मला धरुन देत आहेस काय?”



सैनकि येशूला पकडत असतांना पेत्राने आपली तलवार काढली व महायाजकाच्या सेवकाचा कान छाटून टाकला. येशू म्हणाला,“तलवार म्यानात घाल! मी पित्यास माझ्या बचावासाठी देवदूतांचे सैन्य मागू शकतो. परंतू मला पित्याची आज्ञा पाळणे आवश्यक आहे. तेंव्हा येशूने त्या मनुष्याचा कान लगेच बरा केला. येशूला धरुन नेण्यात आलेले पाहून, सर्व शिष्य पळून गेले.

बायबल कथा*: मत्तय 26:14−56;* मार्क *14 : 10−50;* लूक *22 : 1−53;* योहान *12:6; 18:1 − 11*

# 39. येशूची परीक्षा



हा मध्यरात्रीचा समय होता. सैनकि येशूची परीक्षा पाहण्यासाठी त्याला महायाजकाच्या घरी घेऊन गेले. पेत्र लांबूनच त्यांच्या पाठीमागे येत होता. ते जेंव्हा येशूला आत घरामध्ये घेऊन गेले, तेंव्हा पेत्र बाहेर थंडी असल्यामुळे शेकत बसला होता.



आत घरामध्ये यहूदी धर्मपुढारी येशूची परीक्षा पहात होते. त्यांनी येशूविरुध्द अनेक खोटे साक्षदिार आणले होते. तथापि, त्यांच्या जबानीमध्येही फरक आढळून आल्याने यहूदी पुढार्यांना येशूचा गुन्हा स्पष्ट करता आला नाही. या समयी येशू काहीच बोलला नाही.



शेवटी, महायाजकाने येशूकडे पाहून विचारले,“आम्हास सांग, की तू खरोखर मसिहा, जिवंत देवाचा पुत्र आहेस?”



येशू म्हणाला,“होय, मी आहे, आणि तुम्ही मला पित्याच्या बाजूस बसलेला व स्वर्गातून आलेला असा पहाल.” तेंव्हा महायाजकाने आपली वस्त्रे फाडली व रागाने अन्य धार्मिक पुढाऱ्यांसमोर मोठयाने म्हणाला,“आता आम्हास आणखी पुराव्याची गरज नाही! तो देवाचा पुत्र आहे असे तुम्ही स्वत: ऐकले आहे. तुमचा निवाडा काय आहे?”



सर्व यहूदी पुढार्यांनी महायाजकास उत्तर दिले,“तो मरण दंडास पात्र आहे!” मग त्यांनी येशूच्या डोळयांवर पट्टी बांधली, त्याच्या तोंडावर थुंकले, त्यास मारिले व त्याची थट्टा उडविली.



पेत्र घराबाहेर वाट पहात होता, तेंव्हा घरकाम करणार्या एका मुलीने त्यास म्हटले,“तूही येशूबरोबर होतास!” पेत्राने नकार दिला. नंतर, दुसर्या एका मुलीने असेच म्हटले, आणि पेत्राने पुन्हा एकदा नकार दिला. शेवटी, लोक म्हणाले,“आम्हास ठाऊक आहे की तू येशूबरोबर होतास कारण तुम्ही दोघेही गालिलि आहात.



तेंव्हा पेत्राने शपथ घेऊन म्हटले,‘जर मी हया मनुष्यास ओळखत असेल तर देव मला शापति करो!” लगेच कोबडा आरवला, आणि येशून मागे वळून पेत्राकडे पाहलि.



तेंव्हा पेत्र दूर जाऊन खूप रडला. दरम्यान, येशूस धरुन देणार्या यहूदाने पाहलि की, यहूदी धर्मपुढार्यांनी येशूला मरणदंडाची शक्षिा ठोठावली आहे. तेंव्हा यहूदास असे केल्याचा पस्ताव झाला व त्याने जाऊन आत्महत्या केली.



दुसऱ्या दविशी सकाळीच यहूदी पुढाऱ्यांनी येशूला रोमी सुभेदार पलितासमोर आणले. त्यांना पलिताकडून आज्ञा होती की तो येशूस दोषी ठरवून मरणदंडाची शक्षिा देईल. पलिताने येशूला वचिारले,"तू यहूद्यांचा राजा आहेस काय?"



येशूने उत्तर दलिे,"तू असे म्हणतोस परंतू माझे राज्य हया पृथ्वीचे नाही. असे असते तर माझे सेवक माझ्यासाठी लढले असते. मी या पृथ्वीवर देवावषियीचे सत्य सांगण्यास आलो आहे. सत्यावर प्रेम करणारा प्रत्येक जण माझे ऐकतो" पलिताने वचिारले,"सत्य काय आहे?"



येशूबरोबर बोलल्यानंतर पलित बाहेर असलेल्या जमावास म्हणाला,“मला या मनुष्यामध्ये काहीच दोष आढळत नाही.” परन्तु यहूदी पुढारी व लोकसमुदाय मोठयाने ओरडले, “त्याला क्रूसावर टांगा!” पलित उत्तरला,“तो निर्दोष आहे!” पण ते आणखी मोठयाने ओरडू लागले. तेंव्हा पलित तसिर्यांदा म्हणाला,“तो निरपिराण आहे.”



जमाव आपल्या वरिुधि्द बंड पुकारलि अशी पलितास भर्ती वाटली व त्याने आपल्या सैनकिांस येशूला क्रूसावर टांगण्याची शकि्षा दलिी. रोमी सैनकिांनी येशूला फटके मारलि, त्याच्या अंगावर एक राजकीय झगा घातला व डोक्यावर काटयांचा मुकुट ठेवलि. मग ते त्याची थट्टा करु लागले,“पहा, हा यहूद्यांचा राजा!”

# 40. येशूला वधस्तंभावर खिळितात



सैनिकांनी येशूची थट्टा उडविल्यानंतर ते त्यास वधस्तंभावर खिळे ठोकून मारण्यासाठी घेऊन गेले. ज्या वधस्तंभावर त्यास मारावयाचे होते तो अवजड वधस्तंभ त्यांनी त्याच्या खांदयावर दिला.



तेंव्हा “कवटी” असलेल्या ठिकाणी ते त्याला घेऊन आले आणि त्यांनी येशूच्या हातामध्ये व पायामध्ये खिळे ठोकली. परंतू येशू म्हणाला,“हे पित्या, यांना क्षमा कर, कारण ते काय करतात ते त्यांना कळत नाही.” पिलाताने त्यांना आज्ञा दिली की त्यांनी “यहूद्यांचा राजा” अशी लिहिलेली पाटी क्रूसाच्या वर येशूच्या डोक्यावर लावावी.



येशूचे वस्त्र वाटून घेण्यासाठी सैनिकांनी चठि्टया टाकल्या. त्यांनी असे केल्यामुळे ही भविष्यवाणी पूर्ण झाली," त्यांनी माझे वस्त्र वाटून घेण्यासाठी चठि्ठया टाकल्या."




येशूला दोन डाकूंच्या मधोमध वधस्तंभावर खळिण्यात आले. त्यापैकी एकाने येशूची थट्टा केली, परंतू दुसरा म्हणाला,"तू देवाला भति नाही काय? आपण दोषी आहोत, पण हा मनुष्य नरि्दोष आहे." तेंव्हा तो येशूला म्हणाला,"तुझ्या राज्यामध्ये माझी आठवण ठेव." येशू त्यास म्हणाला,"आजच तू मजबरोबर सुखलोकात असशलि."



यहूदी पुढारी व लोकसमुदायानेही येशूची थट्टा केली. ते त्यास म्हणाले,“जर तू देवाचा पुत्र आहेस तर खाली उतरुन ये व स्वत:चा बचाव कर! म्हणजे आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवू.”



तेंव्हा भर दुपारी आकाशामध्ये काळोख निर्माण झाला व सर्व प्रांतामध्ये अंधकार पसरला. दुपारपासून तीन वाजेपर्यंत पृथ्वीवर काळोख होता.



तेंव्हा येशू मोठयाने म्हणाला,"पूर्ण झाले! "हे पित्या मी माझा आत्मा तुझ्या हाती सोपवितो." तेंव्हा त्याने आपले डोके लवून प्राण सोडला. येशू मरण पावला असतांना मोठा भूकंप झाला आणि मंदिरातील पडदा वरपासून खालपर्यंत दुभांगला गेला.



आपल्या मृत्यूद्वारे येशूने लोकांसाठी देवाकडे जाण्याचा मार्ग खूला करुन दिला. येशूचा पहारा करत असलेल्या सैनिकाने हे सर्व पाहून उद्गारला,"खरोखर, हा मनुष्य निष्पाप होता. तो देवाचा पुत्र होता."



तेंव्हा योसेफ आणि निकिदेम ही दोघे यहूदी पुढारी ज्यांनी येशू हा मसीहा आहे असा विश्वास ठेवला होता, पिलाताकडे जाऊन येशूचे पार्थिव शरीर मागितले. त्यांनी त्याचे शरीर वस्त्रांनी गुंडाळून खडकामध्ये खोदलेल्या एका कबरेमध्ये ठेवले. मग त्यांनी त्या कबरेच्या दाराशी एक मोठी धोंड उभी केली.

बायबल कथा: मत्तय *27:27-61;* मार्क *15:16-47;* लूक *23:26-56;* योहान *19:17-42*

# 41. देव येशूला मेलेल्यांतून उठवितो



सैनिकांनी येशूला वधस्तंभावर खिळल्यानंतर विश्वास न ठेवणा-या यहुदी पुढा-यांनी पिलातास म्हटले, “तो खोटारडा येशू म्हणाला होता की तो तीन दिवसांनंतर पुन्हा उठेल. कोणीतरी त्या कबरेवर पहारा ठेवणे अगत्याचे आहे, नाहीतर त्याचे शिष्य त्याचे शरीर चोरून नेतील व तो उठला आहे असे म्हणतील.”



पिलान म्हणाला, “काही सैनिकांना ह्या व त्या ठिकाणी कडक पहारा ठेवा.” तेव्हा त्यांनी त्या धोंडीवरती मोहर लावली व खात्री केली की कोणी येशूचे शरीर चोरू नये.



येशूच्या दफनानंतर दुसरा दविस हा शब्बाथ दविस होता, त्या दविशी यहुद्यांना कबरेकडे जाण्याची मनाई होती. तेव्हा शब्बाथच्या दुस-या दविशी पहाटेच काही स्त्रयिा सुगंधी द्रव्ये घेऊन कबरेवर गेल्या. त्यांनी ती त्याच्या उत्तरक्रयिेसाठी तयार केली होती.



तेव्हा अचानक एक मोठा भूकंप झाला. आणि एक पांढराशुभ्र देवदूत स्वर्गातून प्रकट झाला. त्याने कबरेच्या मुखाशी असलेली धोंड बाजूला सारली व त्यावर बसला. तेव्हा त्या कबरेवर पहारा करत असलेल्या सैनकिांना फार भतिी वाटली व ते एका मृतासारखे होऊन पडले.



जेव्हा त्या स्त्रयिा कबरेजवळ आल्या, तेव्हा देवदूत त्यांना म्हणाला, “भऊि नका. येशू येथे नाही. त्याने सांगतिल्याप्रमाणे तो उठला आहे! पाहा, ह्या ठकिाणी त्याला ठेवले होते.” तेव्हा त्या स्त्रयिांनी आत जाऊन जेथे येशूचे शरीर ठेवले होते, ती जागा पाहलिी. त्याचे शरीर त्या ठकिाणी नव्हते!



तेव्हां देवदूत त्यांना म्हणाला, “जा, आणि शिपायांना सांगा, ‘येशू मरणातून उठला आहे व तो तुमच्यापुढे गाललिास जात आहे.’”



हे ऐकून स्त्रियांना फार भिती वाटली व आनंदही झाला. त्यांनी धावत जाऊन शिष्यांनी ही आनंदाची बातमी दिली.



त्या स्त्रिया शिष्यांना ही बातमी द्यायला जात असतांना मार्गावर त्यांना येशूने दर्शन दिले, आणि त्यांनी त्याला नमन केले. येशू म्हणाला, “भिऊ नका. जा आणि माझ्या शिष्यांनी गालीलात यायला सांगा मी त्यांना तेथे भेटेन.”

बायबल कथा:: मत्तय २७:६२ – २८:१५; मार्क १६:१ – ११; लूक २४:१ – १२; योहान २०:१ – १८

# 42. येशूचे स्वर्गारोहण होते



येशू मेलेल्यातून ज्या दविशी उठला त्या दविशी त्याची दोन शष्यि जवळच्या एका नगरामध्ये जात होती. ते रस्त्याने चालत असतांना येशूला काय झाले होते ह्यावषियी बोलत होते. त्यांनी येशू हा मसहिा असल्याचा वश्विास ठेवलिा होता, परंतु येशूचा वध करण्यात आला आता त्या स्त्रयिा म्हणत होतेया की तो पुन्हा जविंत झाला आहे. आता कशावर वश्विास ठेवावा हे त्यांना कळत नव्हते.



येशू त्यांच्याबरोबर चालू लागला, पण त्यांनी त्याला ओळखलिे नाही. ते कशावषियी बोलत होते हे त्याने त्यांना वचिारले, आणा त्यिांनी त्याला येशूवषियी घडलेल्या उल्लेखनीय गोष्टी सांगतिल्या. त्यांना वाटले की ते एका अनोळख्या व्यक्तबिरोबर यरूशलेमच्या गोष्टी करत आहेत.



तेव्हा येशूने त्यांना स्पष्टकिरण दलिे की, देवाचे वचन मसहिावषियी काय शकिवति. त्याने त्यांना आठवण करून दलिी की संदेष्यांनी सांगतिले होते की मसहि दुःख सोशील, त्यास जीवे मारतील, पण तीस-या दविशी तो पुन्हा उठेल. जेव्हा ते दोघे त्या गावाजवळ आले जेथे त्यांना मुक्काम करावयाचा होता, तेव्हा फार अंधार पडला होता.



त्या दोघांनी येशूला आपल्याबरोबर मुक्काम करण्याचा आग्रह केला व तो त्यांच्याबरोबर गेला. ते सायंकाळच्या भोजनावर बसलेले असतांना येशूने भाकर घेऊन ती मोडलिी व देवाचा धन्यवाद केला. तेव हा अचानक तो येशू आहे हे त्यांनी ओळखले. परंतु त्या समयी येशू त्या ठकिाणाहून लोप पावला.



ती दोघे एकमेकांना म्हणू लागली, “तो येशू होता! आणि म्हणूनच त्याने देवाचे वचन आम्हाला फोड करून सांगत असतांना आमच्या अंतःकरणास चुटचुट लागली होती!” तेव्हा लगेच घाईघाईने ते यरुशलेमेस परतले. त्यांनी येऊन शिष्यांना सांगितिले की, “येशू जिवंत झाला आहे! आम्ही त्यास पाहिले आहे!”



शिष्य हे बोलत असतांनाच येशूने त्या खोलीमध्ये स्वतःला प्रकट केले व म्हटले, “तुम्हास शांती असो!” शिष्यांना वाटले की ते भूत आहे, पण येशू म्हणाला, “तुम्ही भयभित होऊन संदेह का करता? माझ्या हाताकडे व पायाकडे पहा. भूतांना मनुष्यासारखे शरीर नसते.” तो भूत नव्हता हे सिद्ध करून दाखवण्यासाठी त्याने त्यांस खाण्यासाठी काही आहे काय ते विचारले. त्यांनी त्यांस शिजविलेला मासा दिला, आणि त्याने तो त्यांच्यासमोर खाल्ला.



येशू म्हणाला, “मी तुम्हास सांगितिले होते की माझ्यावषियी देवाच्या वचनामध्ये लहिलिेल्या सर्व गोष्टींची पूर्तता होणे अगत्याचे आहे.” मग त्याने त्यांची अंतःकरणे उघडली, तेव्हा त्यांना देवाचे वचन कळले. तो म्हणाला, “अनेक वर्षांपूर्वी असे लहिलिे होते की मसहिा दुःख सहन करील, त्यास मारतील व तीस-या दविशी तो मरणातून पुन्हा उठेल.



“धर्माशास्त्रामध्ये हेही लहिलिे होते की पापांच्या क्षमेसाठी पश्चातापाची घोषणा माझे शष्यि करतील. ते यरूशलेमेपासून ह्या संदेशास आरंभ करतील, मग सर्व लोकगटाच्या लोकांकडे हा संदेश घेऊन जातील. तुम्ही ह्या गोष्टींचे साक्षीदार आहात.”



पुढील चाळीस दविसांमध्ये येशू अनेक वेळा शष्यिांना प्रकट झाला. एकदा तर तो ५०० हून अधकि लोकांस एकाच वेळी प्रकट झाला. त्याने आपण जविंत असल्याची खात्री व प्रमाण शष्यिांना ववििध मार्गाने दलिे व त्यांना देवराज्यावशियी शकिवण दलिी.



येशू आपल्या शष्यिांना म्हणाला, “स्वर्ग व पृथ्वी यांचा सर्व अधकिार मला देण्यात आला आहे. म्हणून तुम्ही जा व सर्व राष्ट्रांतील लोकांस शष्यि बनवा आणि पिता, पुत्र व पवत्रि आत्माच्या नावाने त्यांना बाप्तस्मिा द्या, आणि मी आज्ञापलिेल्या सर्व गोष्टी त्यांना पाळावयास शकिवा. आणि स्मिरण ठेवा की मी सदैव तुम्हाबरोबर आहे.”



येशूच्या पुनरूत्थानानंतर चाळीस दविसांनी येशूने शष्यिांस सांगतिले, “जोपर्यंत माझा पति तुम्हास सामर्थ्य देणारा पवति्र आत्मा तुम्हावर पाठवत नाही, तोपर्यंत यरूशलेम सोडून जाऊ नका.” तेव्हा येशू स्वर्गात घेतला गेला व तो मेघाऊढ होऊन दृष्टगिोचर झाला. तेथे स्वर्गयि पत्याच्या उडव्या बाजूस वरािजमान होऊन येशू सर्व गोष्टींवर अधकािर गाजवण्यािसाठी सज्ज झाला.

बायबल कथा: मत्तय २८:१६–२०; मार्क १६:१२–२०; लूक २४:१३–५३; योहान २०:१९–२३; प्रेषति १:१–११

# 43. मंडळीची सुरूवात



येशूचे स्वर्गारोहण झाल्यानंतर, येशूने सांगितल्याप्रमाणे शिष्य यरूशलेमेतच राहिले. तेथिल विश्वसणारे निरंतर एकत्र येऊन प्रार्थना करू लागले.



वल्हांडणानंतर ५० दिवसांनी प्रतिवर्षी यहुदी लोक पेंटेकॉस्ट नावाचा सण साजरा करत. पेंटेकॉस्ट हा यहुदी लोकांना हंगामाचा सण होता. जगातील सर्व यहुदी लोक यरुशलेमेत येऊन पेंटेकॉस्ट सण साजरा करत. यावेळी येशूचे स्वर्गारोहण झाल्यानंतर सुमारे एक आठवड्यानंतर पेंटेकॉस्टचा सण आला होता.



सर्व विश्वासणारे एकत्र मिळून प्रार्थना करत असतांना एका सोसाट्याच्या वा-यासारखा ध्वनी झाला व त्याने संपूर्ण खोली भरून गेली. तेव्हा अग्निच्या जिव्हासारख्या जिभा त्यांना दिसल्या व त्यांच्या डोक्यावर स्थिरावल्या. ते सर्व पवित्र आत्म्याने भरून गेले व अन्य-अन्य भाषा बोलू लागले.



यरूशलेमेतील लोक हा आवाज ऐकून काय झाले आहे ते पाहण्यासाठी आले. जेव्हा विशावासणा-यांना देवाची आश्चर्यकरमे प्रकट करतांना व त्यांच्याच मातृभाषेमध्ये बोलत असलेले पाहून लोकांना फार आश्चर्य वाटले.



काही लोकांना वाटले की वशि्वासणारे मद्यपान करून दंग झाले आहेत. परंतु पेत्र उभा राहून त्यांना म्हणाला, “इकडे लक्ष द्या! ही माणसे मद्यपान करून मस्त झाली नाहीत! ह्या घटनेद्वारे योएल भवषि्यवक्त्याने केलेली भवषि्यवाणी पूर्ण होत आहे,”शेवटच्या काळामध्ये मी आपला आत्मा ओतलि.’"



“अहो इस्त्राएल लोकांना, येशूने देवाच्या शक्तद्विारे अनेक चनि्हे व अद्भुते केली, जी तुम्ही स्वतः डोळ्याने पाहलिी व अनुभवली आहेत. पण तुम्ही त्यास वधस्तंभावर खळिलिे!”



“जरी येशू मरण पावला होता, तरी देवाने त्यास मेलेल्यांतून पुन्हा उठविले. ह्या घटनेद्वारे ही भविष्यवाणी पूर्ण होते,”तू आमल्या पवित्र जणास कबरेमध्ये सडू देणार नाहीस? आम्ही ह्या गोष्टीविषयीचे साक्षीदार आहेत की देवाने येशूला मरणातून पुन्हा उठविले आहे."



“येशू आता आपल्या पित्याच्या उजव्या बाजूस विराजमान आहे. आणि येशूने आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांने आम्हासाठी पवित्र आत्मा पाठविला आहे. आता जे तुम्ही पहात व ऐकत आहात, त्या सर्व गोष्टी पवित्र आत्मा करत आहे.”



“तुम्ही ह्या मनुष्यास क्रुसावर टांगले. परंतु आता तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करून ठेवले आहे!”



पेत्राचे भाषण ऐकणा-यांच्या मनाला चुटचुट लागली. म्हमून त्यांनी पेत्र व अन्य प्रेषितिंना वचिारले, “बंधुजनहो, आम्ही आता काय करावे?”



पेत्र त्यांना म्हणाला, “तुम्हांपैकी प्रत्येकाने आपआपल्या पापांचा पश्चाताप कराव येशू ख्रस्तिाच्या नावामध्ये बाप्तस्मिा घ्या, म्हणजे देव तुम्हास क्षमा करील. मग तो तुम्हास पवत्रि आत्म्याचे दान देखलि देईल.”



तेव्हा सुमारे ३,००० लोकांनी वश्विास ठेवलिा व ते येशूचे शष्यि झाले. त्यांनी बाप्तस्मिा घेतला व यरूशलेम मंडळीमध्ये सामलि झाले.



शिष्यांनी देवाचे वचन शिकणे, सहभागिता, भाकर मोडणे व प्रार्थनेमध्ये समय व्यतित केला. त्यांनी देवाची स्तुती केली आणि त्यांचे सर्व काही सामायिक होते. सर्व एकमेकांची काळजी घेत होते. प्रतिदिवशी त्यांच्यामध्ये नवीव विश्वासणा-यांची भर पडत होती.

बायबल कथाः

# 44. पेत्र् व योहान एका भकि-यास बरे करतात



एके दविशी पेत्र व योहान मंदरिमध्ये जात होते. ते मंदरिाच्या प्रवेशद्वाराजवळ जात असतांना त्यांनी एक लंगडा भकिारी भकि मागत असतांना पाहलिा.



पेत्राने त्या पांगळ्या मनुष्याकडे पाहून म्हटले, "तुला देण्यासाठी माझ्याकडे पैसे नाहीत. पण माझ्याकडे जे आहे ते मी तुला देतो. येशूच्या नावामध्ये उठ आणि चालू लाग!"



लगेच तो पांगळा मनुष्य बरा झाला, तो उठून उभा राहलिा व तो उड्या मारत आनंदाने देवाची स्तुती करू लागला. मंदरितील लोकांनी त्याला पाहून आश्चर्य केले.



त्या ब-या झालेल्या मनुष्यास पाहण्यासाठी लोकांनी त्याच्याभोवती गर्दी केली. पेत्र त्यांना म्हणाला, “हा मनुष्य बरा झालेला पाहून तुम्ही का आश्चर्य करता?” आम्ही आमच्या सामर्थ्याने त्यास बरे केले नाही. तर येशूच्या शक्तद्विारे व देवाने दलिेल्या वश्विासाद्वारेच हा मनुष्य बरा झाला आहे."



“तुम्ही रोमी सम्राटास येशूला जीवे मारावयास सांगितिले. तुम्ही जीवनदात्यास ठार मारलि, परंतु देवाने त्यास मेलेल्यांतून पुन्हा उठवलि. जर तुम्ही काय करत होता ते तुम्हास कळले नाही, तरी देवाने तुमच्या करवी मसहिा दुःख सोशलि ही भवषि्यवाणी पूर्ण करून घेतली आहे. यास्तव, आता पश्चाताप करा व देवाकडे वळा म्हणजे तुमच्या पापांची क्षमा होईल.”



मंदरितील पुढारी पेत्र व योहान यांचे भाषण ऐकून संतापले. म्हणून त्यांनी त्यांस धरून तुरुंगात टाकलि. परंतु पुष्कळ लोकांनी पेत्राच्या वचनावर वशि्वास ठेवलि, आणि आता वशि्वासणा-यांची संख्या वाढून सुमारे ५००० झाली.



दुस-या दविशी यहुदी लोकांनी पेत्र व योहान यांना महायाजकासमोर व धर्मपुढा-यांसमोर उभे केले. त्यांनी पेत्र व योहान यांना वचिारले, “तुम्ही कोणत्या शक्तद्विारे ह्या पांगळ्या मनुष्यास बरे केले?”



पेत्र त्यांना म्हणाला, “हा मनुष्य येशू ख्रस्तिाच्या नावामध्ये बरा होऊन तुम्हापुढे उभा आहे. तुम्ही येशूला खळिलिे, परंतु देवाने त्यास पुन्हा जविंत केले! तुम्ही त्यास नाकारलिे, परंतु आता येशू ख्रस्तिाशविाय तारणाचा दुसरा मार्ग नाही!”



हे ऐकून धार्मकि पुढा-यांना आश्चर्याचा धक्का बसला, कारण पेत्र व योहान सामान्य जण असतांना व अडाणी असूनही त्यांच्यासमोर मोठ्या धाडसाने बोलत होते. परंतु त्यांनी ते येशूच्या सहवासात होते हे ओळखले. मग त्यांनी धमकावले व जाऊ दलि.

बायबल कथाः

# 45. फलिपि आणा इधिओपयिन अधकिारी



प्रारंभीच्या मंडळींमध्ये स्तेफन नावाचा एक पुढारी होता. तो एक सभ्य पुरूष होता, ज्ञानी व पवति्र आत्म्याने परपिूर्ण असा होता. स्तेफनाने अनेक चमत्कार केले व लोकांनी येशूवर वशि्वास ठेवावा यास्तव अनेक तर्क-वतिर्क केला.



एके दविशी स्तेफन येशूवषियी शकिवण देत असतांना, वशि्वास न ठेवणारे काही यहुदी त्याच्याशी ववािद करू लागले. त्यांना स्तेफनाचा फार राग आला व त्याच्यावर त्यांनी धार्मकि पुढा-यांसमोर खोटे दोषारोपण केले. ते म्हणाले, “आम्हगी त्यास मोसे व देवावषियी अपशब्द बोलतांना ऐकले आहे!” तेव्हा धार्मकि पुढा-यांनी स्तेफनास अटक केले व त्यास महायाजक व अन्य पुढा-यांसमोर उभे करून त्याच्यावर आणखी खोटे आरोप लावलि.



महायाजक स्तेफनास म्हणाला, “ह्या गोष्टी ख-या आहेत का?” स्तेफनाने त्यांस उत्तर देत देवाने अब्राहमापासून तर येशूपर्यंत कशा प्रकारे आश्चर्यकरमे केली व देवाच्या लोकांनी नरितर कशा त्याच्या आज्ञा मोडलि्या ह्याविषयी आठवण करून दलिी. मग तो म्हणाला’ “अहो ताठ मानेच्या व बंडखोर लोकांनो, जसे तुमचे पूर्वज पवति्र आत्म्याचा वरिोध करत होते, तसात तुम्ही करत आहात. परंतु तुम्ही त्यांच्याहीपेक्षा वाईट केले आहे! तुम्ही मसहिास जीवे मारलिे आहे!”



जेव्हा धार्मकि पुढा-यांनी हे ऐकले, तेव्हा त्यांना खूप राग आला व त्यांनी आपल्या कानांवर हाथ ठेवून मोठ्याने ओरडले. त्यांनी स्तेफनास नगराच्या बाहेर ओढत नेले आणि त्यास दगडमार केला.



स्तेफन मरत असतांना त्याने आरोळी मालरी, “येशू, माझ्या आत्म्यास ग्रहण कर.” मग त्याने गुडघ्यावर पडून पुन्हा म्हटले, “स्वामी, हे पाप त्यांच्याकडे मोजू नकोस.” मग त्याने प्राण सोडिला.



शौल नावाचा एक तरूण मनुष्य स्तेफनाच्या मृत्युशी सहमत होता व त्यास दगडमार करणा-यांची वस्त्रे तो सांभाळत होता. त्या दविसांमध्ये यरूशलेमेतील लोक येशूच्या शष्यिांचा छळ करत होते, म्हणून शष्यि दुस-या ठकिाणी पळून गेले. पण, असे असतांनाही, जेथे कोठे ते गेले, त्यांनी येशूवषियी प्रचार केला.



फलिपि नावाचा येशूचा शष्यि छळामूळे दुस-या ठकिाणी पळून गेला होता. तो शोमरोनामध्ये पळून गेला होता व त्या ठकिाणी त्याने येशूची सुवार्ता सांगतिली व अनेकांचे तारण झाले. तेव्हा एके दविशी देवाचा एक दूत येऊन फलिपिास वाळवंटातील एका मार्गावर घेऊन गेला. तो रस्त्याने चालत असतांना फलिपिाने इथओिपयिा देशाचा एक अधकिारी आपल्या रथामध्ये जात असतांना पाहलिा. पवति्र आत्म्याने फलिपिास त्या व्यक्तशिी बोलण्यास सांगतिले.



जेव्हा फलिपिप रथाजवळ आला, तेव्हा त्याने इथओिपयिन यशया संदेष्ट्याचा ग्रंथ वाचत असतांना ऐकले. तो वाचत होता, "त्याला मेंढरासारखे वधासाठी नेले; आणि जिसे कोकरू कातरणा-याच्या पुढे गप्प असते, तसा तो आले तोंड उघडीत नाही. त्यांनी त्याचा सन्मान केला नाही. त्यांनी त्यास जीवे मारलि."



फलिपिाने इथओिपयिनास वचिारले, “तुम्ही जे वाचत आहात, ते तुम्हास समजते का!” इथओिपयिनाने उत्तर दलिे, “नाही. जोपर्यंत मला कोणी समजावून सांगत नाही, तोपर्यंत मी समजू शकत नाही. कृपया येऊन माझ्या बाजूस बसा. यशया संदेष्टा स्वतःवषियी की अन्य कोणावषियी लहिति आहे?”



फलिपिाने त्या इथओिपयिनास स्पष्टकिरण देत सांगतिले की संदेष्टा हे मसहिावषियी लहिति आहे. फलिपिाने अन्य शास्त्रपाठातूनही संदर्भ घेऊन त्यास येशूवषियीची सुवार्ता सांगतिली.



फलिपि आणि इथओपियिन अधकिारी पुढे प्रवास करत-करत एका तळ्याजवळ आले. इथओपियिन अधकिारी म्हणाला, “पहा! येथे थोडे पाणी आहे! मी बाप्तस्मि घेऊ शकतो का?” आणि त्याने सारथ्यास रथ थांबावयास सांगतिले.



मग ते पाण्यामध्ये उतरले आणि फिलिपिाने त्या इथओपियिन अधकिा-यास बाप्तस्मि दलिा. ते पाण्यातून वर आल्यानंतर पवत्रि आत्मा फलिपिास दूस-या नगरास घेऊन गेला व त्याने त्या ठकिाणी येशूची सुवार्ता लोकांना सांगतिली.



इथिओपियन इकडे आनंदाने आपल्या घराकडे वाटचाल करू लागला, कारण त्याला येशूची ओळख झाली होती.

बायबल कथा: प्रेषित *6:8–8:5; 8:26–40*

# 46. पौल ख्रिस्ती बनतो



स्तेफनाच्या मरणाच्या समयी शौल हा दगडमार करणा-यांची वस्त्रे सांभाळत होता. तो येशूवर विश्वास ठेवत नव्हता, म्हणून तो विश्वासी लोकांचा छक करत असे. तो घरोघरी जाऊन यरूशलेमेतील विश्वास ठेवणा-या स्त्री-पुरूषांस तुरूंगात टाकत असे. महायाजकाने शौलास दमष्कि शहरातील ख्रिस्ती लोकांस पकडून यरूशलेमेस आणण्यासाठी परवाना दिला होता.



शौल दमश्किाच्या मार्गावर प्रवास करत असतांना, अचानक स्वर्गातून एक विज चमकली व त्याच्या तोंडावर प्रकाश पडला आणि तो लगेच खाली कोसळला. शौलाने कोणास तरी हाक मारतांना ऐकले, “शौला! शौला! तू माझा छळ का करत आहेस?” शौलाने विचारले, “प्रभु, तू कोण आहेस?” येशूने त्यास म्हटले, “मी येशू आहे. तू माझा छळ करत आहेस!”



शौल जेव्हा उठला तेव्हा तो आंधळा झाला. तेव्हा त्याचे मत्रि त्याला दमषि्कास घेऊन गेले. शौलाने तीन दविस काहीच खाल्ले नाही.



दमषि्कात अनन्या नावाचा एक शषि्य होता. देव त्यास म्हणाला, “शौल रहात असलेल्या घरी जा. आणि त्याच्यावर हाथ ठेव म्हणजे त्यास पुन्हा दृष्टि मळिेल.” परंतु अनन्या म्हणाला, “स्वामी, मी ऐकले आहे की हा मनुष्य कशाप्रकारे खि्रस्ती लोकांचा छळ करत आहे.” देव त्यास म्हणाला, “जा! कारण राजांसमोर, अन्य राष्टांसमोर व यहुदी लोकांसमोर माझे नाव घेऊन जाण्याकरति तो माझे नविडलेले पात्र आहे. तो माझ्या नावासाठी खूप दुःख सोसणार आहे.”



तेव्हा अनन्याने शौलाकडे जाऊन त्याजवर आपले हाथ टेवलि व म्हणाला, “जो येशू तुला मार्गामध्ये प्रकट झाला, त्याने मला तुझ्याकडे पाठवलि आहे, अशासाठी की, तुझी दृष्टि तुला पुन्हा प्राप्त व्हावी व तू पवति्र आम्ताने परपिूर्ण व्हावे.” शौलाची दृष्टि पुन्ही आली व त्यास दसिू लागले, आणि मिग अनन्याने त्यास बाप्तस्मिा दलिा. तेव्हा शौलाने अन्न ग्रहण केले व त्यास शक्ति मिळिाली.



लगेच शौल दमष्किामध्ये असणा-या यहुद्यांना प्रचार करू लागला व म्हणाला, “येशू हा देवाचा पुत्र आहे.” यहुद्यांना हे पाहून मोठे आश्चर्य वाटले की ख्रसि्ती लोकांचा छळ करणारा आता येशूवर वशि्वास ठेवतो व त्याचा प्रचार करत आहे! शौलाने तर्क-वतिर्क करून यहुद्यांना येशू हा मसहिा असल्याचे सदि्ध केले.



पुष्कळ दविसांनंतर यहुद्यांनी शौलास मारण्याचा कट रचना. शहराच्या प्रवेशद्वाराजवळ शौलास आडवण्यि़ासाठी त्यांनी काही लोक नेमलिे. परंतु शौलाला हे कळले व त्याच्या मति्रांनी त्याची सुटका होण्यास मदत केली. एके रात्री त्यांनी वेशीच्या भंतिीवरून एका टोपलीमध्ये त्याला सोडून दलिे. शौल दमषि्कातून सुटल्यानंतर येशूचा प्रचार करू लागला.



शौल यरूशलेमेस शषि्यांना भेटण्यासाठी गेला, परंतू त्यांना त्याची भतिी वाटली. तेव्हा बर्नबास नावाच्या एका वश्विासणा-याने शौलास प्रेषतिांकडे नेले व सांगतिले की कशा प्रकारे शौलाने दमषि्कामध्ये येशूचा मोठ्या धाडसाने प्रचार केला. त्यानंतर शषि्यांनी त्याचा स्वकिार केला.



यरूशलेमेतील छळामूळे काही वश्विासणारे दूर अंतुकयिा शहरामध्ये गेले व तेथे त्यांनी येशूचा प्रचार केला. अंतुकयिामध्ये यहुदी लोक फारच कमी होते, पण तेथील लोकांनी प्रथमच येशूवषियी ऐकून वश्विास ठेवलिा. बर्नबास आणि शौल तेथलि वश्विासणा-यांना शकिवण देण्यासाठी व त्यांना उत्तेजन देण्यासाठी अंतुकयिास गेले. अंतुकयिा शहरामध्येच वश्विासणा-यांना प्रतम "ख्रस्तिी" हे नांव पडले.



एके दविशी अंतुकयिाचे वश्विासणारे उपवास-प्रार्थना करत असतांना पवत्रि आत्मा त्यांच्यावर आला व म्हणाला, "बर्णबास व शौल यांना एका वशिष कामगरिीसाठी मी बोलावले आहे, यास्तव त्यांना वेगळे करा." तेव्हा अंतुकयिा शहरातील मंडळीने शौल व बार्नबासाठी प्रार्थना केली व त्यांच्यावर हात ठेवलिे. आणि मिग त्यांनी वेगवेगळ्या ठकिाणी येशूची सुवार्ता सांगण्यासाठी पाठवलिे. बर्नबास व शौल यांनी अनेक लोकगटांस सुवार्ता सांगतिली व पुष्कळ लोकांनी येशूवर वश्विास ठेवलिा.

वायबल कथा:: प्रेषति *८:३; ९:१ – ३१; ११:१९ – २६; १३:१ – ३*

# 47. फलिप्पी नगरामध्ये पौल आणि शिला



शौल संपूर्ण रोमन साम्राज्यामधून प्रवास करत असतांना त्याने आपल्या “पौल” ह्या रोमन नावाचा उपयोग केला. एके दविशी पौल आणि त्याचा मति्र शलिा हे फलिपि्पी नगरामध्ये येशूची सुवार्ता सांगण्यासाठी गेले. नदीच्या काठेवर काही लोक प्रार्थनेसाठी एकत्रति आलेल्या लोकांकडे ते गेले. तेथे त्यांना लुदयिा नावाची एक व्यापारी स्त्री भेटली. तचिे देवावर प्रेम होते व ती भक्तणि होती.



देवाने लुदयिाचे हृदय उघडले व तनिे येशूवषियीच्या संदेशावर वशि्वास ठेवलिा, मग तनिे आपल्या कुटुंबयिांसहति बाप्तस्मिा घेतला. तनिे पौल व सलिा यांना आपल्या घरी बोलावलिे, तेव्हा ते तचि्या कुटुंबासोबत राहलिे.



पौल आणि सिला प्रार्थनेच्या स्थळी लोकांस वारंवार भेटले. प्रतदिविशी ते चालत असतांना, क दासत्वामध्ये असणारी दुष्टात्माग्रस्त मुलगी त्यांच्यामागे चालू लागली. ह्या दुष्टात्म्याच्या आधारे ती भवष्यिवाणी करत असे, अशा प्रकारे भवष्यि सांगून तनि आपल्या स्वामीसाठी भरपूर पैसे कमवलि होते.



ते रस्त्याने चालत असतांना ती मुलगी ओरडत होती, “ही माणसे परात्मर देवाचे दास आहेत. ते तुम्हास तारणाचा मार्ग सांगत आहेत.!” तनि असे अनेक वेला केल्यामूळ पौलास त्रास झाला.



शेवटी एके दविशी ती मुलगी ओरडू लागली, पौलाने तचि्याकडे वळून तचि्यामध्ये असणा-या पशिाचाला म्हटले, “येशू ख्रस्तिाच्या नावाने मी तुला आज्ञा करतिो की तू हचि्यामधून नघिून जा.” आणा तित्काळ ते पशिाच तलिा सोडून नघिून गेले.



हे पाहून त्या मुलीच्या स्वामीस खूप राग आला! त्यांना जाणवि झाली की दुष्टात्म्याशविाय ती मुलगी भवष्यिवाणी करू शकत नाही. आता त्यांना कळले की लोक आता तचि्या मालकास पैसे देणार नाहीत कारण तचिा भवष्यिवाणी करणारा दुरात्मा नधिून गेला आहे.



तेव्हा या मुलीच्या धन्याने पौल व सिला यांना रोमन अधिका-याकडे नेले व त्यांनी त्यांना मारहाण केली व जेलमध्ये टाकले.



त्यांनी पौल व सिला यांना तुरूंगाच्या एकदम सुरक्षित ठिकाणी ठेवले व त्यांचे हातपाय साखळदंडांनी बांधले. तरीही मध्यरात्रीच्या समयी ते देवाची स्तुती करत होते व गीत गात होते.



अचानक त्या ठकिाणी एक मोठा भूकंप झाला. तेव्हा तुरूंगाचे सर्व दरवाने आपोआप उघडले गेले, आणि कैद्यांचे साखळदंडही तुटून पडले.



तेव्हा तुरूंगाचा अधकिारी जागा झाला आणइ जेव्हा त्याने तुरूंगाचे दरवाजे उघडे पाहलिे तेव्हा तो खूप भयभति झाला. त्याला वाटले की सर्व कैदी पळून गेले असतील, म्हणून तो आत्महत्या करू पहात होता. (त्यास ठाऊक होते जर कैदी नसिटून गेले तर रोमी अदकिारी त्यास जीवे मारतील.) परंतु पौलाने त्यास पाहून म्हटले, “थांब! स्वतःस इजा करून घेऊ नकोस. कारण आम्ही सर्व इथेच आहोत.”



तुरूंगाधकिारी पौल व सलिाकडे जात असतांना थरथर कापत होता, तो म्हणाला, “माझे तारण व्हावे म्हणून मी काय करावे?” पौलाने उत्तर दलिे, “प्रभु येशूवर वश्विास ठेव म्हणजे तुझे व तुच्या घराण्याचे तारण होईल.” तेव्हा तुरूंगाधकिारी पौल व सलिा यांना आपल्या घरी घेऊन गेला आणि त्याने त्यांच्या जखमा धुतल्या. पौलाने त्याच्या घरातील सर्व लोकांना येशूची सुवार्ता सांगतिली.



तुरुंगाधकिारी आणि त्याचे सर्व कुटुंब यांनी येशूवर वश्विास ठेवून बाप्तस्मिा घेतला. तेव्हा तुरूंगाधकिा-याने पौल व सलिा यांना जेवू घातले, आणि देवावर वश्विास ठेवून त्याने व त्याच्या घरच्या सर्व मंडळीने आनंदोत्सव केला.



दुस-या दविशी शहराच्या अधकिा-यांनी पौल व सलिा यांची सुटका केली व फलिप्पिी शहर सोडून त्यांना जाण्यास सांगतिले. तेव्हा पौल व सीला यांना लुदयिा व अन्य बंधूंचा नरिोप घेतला व त्यांनी ते शहर सोडले. येशूवषियीची सुवार्ता पसरत गेली व मंडळीची वाढ होत गेली.



पौल व अन्य ख्रस्तिी पुढारी येशूची सुवार्ता घेऊन अनेक शहरांमधून प्रवास करत गेले. त्यांनी मंडळ्यांना पत्रे पाठवून शकिवण दलिी व प्रोत्साहन दलिे. त्यांपैकी काही पत्रे बायबलमधील पुस्तके झाली.

बायबल कथा: प्रेषति *16:11–40*

# 48. येशू हा अभिषिक्त मसिहा आहे



देवाने जेव्हा सृष्टी बनवली तेव्हा सर्वकाही परिपूर्ण होते. तेथे पाप नव्हते. आदाम आणि हव्वा एकमेकांवर प्रेम करत व त्यांचे द्वावर प्रेम होते. तेथे कुठल्याही प्रकारचा आजार किंवा मृत्यु नव्हता सृष्टी अशीच राहावी अशी देवाची इच्छा होती.



हव्वेला फसवण्यिासाठी सैतानाने सर्पाद्वारे संभाषण केले. तेव्हा तिने व आदामाने देवाविरूद्ध पाप केले. त्यांनी केलेल्या पापाचा परिणाम म्हणून पृथ्वीवरील लोक आजारी पडतात व मरण पावतात.



आदाम आणि हव्वेने पाप केल्यामुळे आणखी एक भयानक गोष्ट घडली. ते देवाचे वैरी झाले. परिणामतः तेव्हापासून पृथ्वीवर जन्म घेणारा प्रत्येक व्यक्ती पापामध्येच जन्मतो व तो देवाचा शत्रु देखिल होतो. पापामुळे देव आणि मनुष्यांमध्ये असणारा संबंध तुटला. परंतु हा संबंध पुन्हा जोडण्याची देवाने एक योजना बनविली.



देवाने अभिवचन दिले की हव्वेचा एक वंशज सैतानाचे डोके फोडिल व सैतान (सर्प) त्याची टाच फोडिल. अर्थात सैदान मसिहास जीवे मारील, परंतु देव त्यास पुन्हा जिवंत करील आणि मग मसिहा सैतानाच्या सत्तेचा संपूर्ण नायनाट करील. अनेक वर्षांनंतर देवाने येशू हाच मसिहा आहे हे प्रकट केले.



जेव्हा देवाने संपुर्ण पृथ्वी जलप्रलयाद्वारे नष्ट केली, तेव्हा त्याजवल विश्वास ठेवणा-यांसाठी देवाने एक जहाज दलिे. त्याचप्रकारे मनुष्यांच्या पापामूळे प्रत्येक जण मृत्युस पात्र आहे, पण त्याजवर विश्वास ठेवणारांस वाचवण्यिासाठी (तारण्यासाठी) देवाने येशूला पाठवलिे.



शेकडो वर्षे महायाजक मनुष्यांना आपल्या पापांची शक्षिा मरण आहे हे दर्शवण्यिासाठी पशुबली व होमार्पणे करत. परंतु त्या अर्पणांद्वारे त्यांच्या पापांची क्षमा होऊ शकली नाही. येशू हा एक थोर महायाजक आहे. अन्य महायाजकांच्या विपरित येशूने संपूर्ण जगातील लोकांसाठी स्वतःचेच अर्पण केले, अशासाठी की जे त्याजवर विश्वास ठेवतील त्यांना पापांची क्षमा व्हावी. येशू हा एक सद्धि महायाजक होता, कारण त्याने सर्वांच्या पापांची शक्षिा आपणावर घेतली.



देवाने अब्राहमास म्हटले, “सर्व राष्ट्रांतील कुळे तुझ्याद्वारे आशीर्वादति होतील.” येशू ख्रस्ति हा अब्राहमाचा वंशज होता. जगातील सर्व कुळे येशूद्वारे आशीर्वादीत झाली, कारण जो कोणी त्याजवर वश्विास ठेवतिो त्याच्या पापांची क्षमा होते व तो अब्राहमाचा आत्मकि वंशज ठरतो.



जेव्हा देवाने अब्राहामास इसहाकाचे अर्पण करावयास सांगतिले, त्व्हा त्याने इसहाकाच्या जागेवर अर्पणासाठी कोकरा पुरवलिा होता. आम्ही आमच्या पापांमुळे मरणदंडास पात्र असे आहोत! परंतु देवाने आपला एकूलता एक पुत्र येशू आमच्यासाठी अर्पण म्हणून पाठवलिा.



जेव्हा देवाने मसिर देशामध्ये शेवटची पीडा पाठवलिी, तेव्हा त्याने त्यांना एक नर्दिोष कोक-याचा वध करून त्याचे रक्त त्यांच्या घरांच्या चौकटीस लावावयास सांगतिले होते. जेव्हा देनावे ते रक्त पाहलिे तेव्हा इस्त्राएलाच्या घराण्यातील प्रतम जन्मलेल्या पुत्रांस त्याने मारलिे नाही. ह्या घटनेस वल्हांडण म्हणतात.



येशू ख्रस्ित हाच आमच्या वल्हांजणाचा कोकरा आहे. तो सद्धि व नर्दिोष होता आणि वल्हांडणाच्या समयी वधला गेला होता. जेव्हा कोणी येशूवर वश्विास ठेवतिो, तेव्हा येशूच्या रक्ताद्वारे त्याच्या पापांची खंडणी भरून देण्यात येते, आणि देव त्यास शक्षिा करत नाही.



देवाने इस्त्राएलाबरोबर एक करार केला होता, हे त्याचे नविडलेले लोक होत. पण त्याने आता सर्वांसाठी उपलब्ध असणारा एक नवा करार केला. ह्या नव्या करारामुळे आता कोणीही येशूवरील वश्िवासाद्वारे देवाची मुले होऊ शकतात.



देवाच्या वचनाचा प्रचार करणारा मोसे हा एक महान संदेष्टा होता. परंतु येशू त्या सर्वांहून अधकि महान संदेष्टा होता. तो देव आहे, म्हणून त्याने बोललेली वचने व केलेली कृत्यु ही देवाचीच होती. म्हणूनच येशूला देवाचे वचन असे म्हणतात.



देवाने दाविद राजाला अभिवचन दिले होते की त्याच्या वंशजांपैकीच एक जण देवाच्या लोकांवर सर्वकाळ राज्य करील. येशू हा देवाचा पुत्र व मसिहा असल्याकारणानेच देवाच्या लोकांवर सर्वकाळ राज्य करणारा तो दाविदाचा एक विशेष वंशज आहे.



दाविद हा इस्त्रायलचा राजा होता, परंतु येशू हा सर्व जगाचा राजा आहे! तो पुन्हा येणार आहे व आपल्या राज्यामध्ये न्यायाने व शांतीने राज्य करणार आहे.

बायबल कथा:

# 49. देवाचा नवा करार



देवाच्या एका दूताने मरयिेस सांगतिले की ती देवाच्या पुत्रास जन्म देणार आहे. म्हणून ती कुमारी असतांनाच एका पुत्रास जन्म दलिा आणि त्याचे नाव येशू ठेवले. यास्तव येशू हा देव व मनुष्य दोन्ही आहे.



येशूने अनेक चमत्कार करून आपण देव असल्याचे प्रमाण पटवून दलिे. तो पाण्यावर चालला, वादळ शांत केले, अनेक आजा-यांना बरे केले, दुष्टात्म्यांना बाहेर काढले, मेलेल्यांना जविंत केले व पाच भाकरी व दोन मासळ्यांद्वारे ५००० पेक्षा अधकि लोकांना पोटभर जेवू घातले.



येशू हा एक थोर शिक्षक होता व देवाचा पुत्र असल्यामुळे अधिकारवाणीने बोलत होता. त्याने शिकविले की लोकांनी आपल्याशी जसे वागावयास हवे म्हणून अपेक्षा करतो, तसेच आपण त्यांच्याशीही वागले पाहिजे.



त्याने शिकवले की आपण आपल्या सर्व वसमतू व मालमत्तेपेक्षा देवावर अधिक प्रिती करावयास हवी.



येशूने म्हटले की जगातील सर्व मौल्यवान वस्तुंपेक्षा देवाचे राज्य हे अधकि मौल्यवान आहे. कोणीही मनुष्यासाठी देवाचे राज्य हे सर्वात महत्त्वाचे आहे. देवाच्या राज्यामध्ये प्रवेश करण्यासाठी आपणांस आपल्या पापांची क्षमा होणे अगत्याचे आहे.



येशूने सांगतिले की काही लोक त्याचा स्वीकार करतील व तारण पावतील, परंतु काहीजण त्यास नाकारतील. त्याने म्हटले की काही लोक सुपकि जमनिीप्रमाणे आहेत. ते येशूची सुवार्ता स्वीकारून तारण पावतात. अन्य लोक कढकाळीसारखे आहेत. ज्या ठकिाणी देवाचे वचन खोलवर न गेल्यामुळे नष्फिळ ठरते. ते लोक येशूचा संदेश नाकारतात व त्यामूळे स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करणार नाहीत.



येशूने सांगितिले की देव पाप्यांवर फार प्रेम करितो. तो त्यांना क्षमा करू इच्छितो व त्यांना आपली लेकरे बनवू पाहतो.



देवाला पापाचा विट आहे असेही येशूने शिकविले. जेव्हा आदाम व हव्वा यांनी पाप केले, तेव्हा ते सर्व मानवजातीमध्ये पसरले. त्याचा परिणाम म्हणून आज प्रत्येक व्यक्ति पाप करतो व देवापासून अलिप्त राहतो. यास्तव, प्रत्येक मनुष्य हा देवाचा वैरी झाला आहे.



परंतु देवाने जगातील प्रत्येक मनुष्यावर एवढी प्रीति केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊ नये, तर त्यास सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.



आपल्या पापांमुळे आपण दोषी व मरणदंडास पात्र आहोत. देव आपणांवर क्रोधाविष्ट व्हावयास हवा होता, पण त्याने आपणाऐवजी येशूवरच सर्व क्रोध ओतला. येशूने वधस्तंभावरील मरण सोसून आपणांस होणारी शिक्षा त्याने स्वतःवर घेतली.




येशूने कधीच पाप केले नाही, परंतु त्याने आपल्या व जगातील सर्व मनुष्यांच्या पापांचे प्रायश्चित्त म्हणून सर्व दंड आपणावर घेतला. येशूने दिलेल्या बलिदानामुळे देव आपणांस आपल्या सर्व पापांची क्षमा करू शकतो.



सत्कर्माद्वारे आपले तारण होऊ शकत नाही. देवाबरोबर समेट घडवून आणण्यासाठी आपण काहीच करू शकत नाही. केवळ येशूच आपली पापे धुवून आपणांस शुध्द करू शकतो. आम्ही असा विश्वास धरिला पाहिजे की येशू हा देवाचा पुत्र आहे, तो आमच्या पापांसाठी वधस्तंभावर मरण पावला, व देवाने त्यास पुन्हा जिवंत केले आहे.



जो येशूवर आपला वैयक्तकि तारणारा म्हणून वशि्वास ठेवतिो, त्या प्रत्येकास देव तारील. परंतु तो वशि्वास न ठेवणा-याचे तारण करणार नाही. आपण गरीब कंवाि श्रीमंत, स्त्री कंवाि पुरूष, तरूण कंवाि वृद्ध असाल कंवाि तुम्ही कोठे राहता यालाही महत्त्व नाही. देव आपणांवर प्रतीि करतो व आपण येशूवर वशि्वास ठेवावा अशी त्याची इच्छा आहे, अशासाठी की त्याने आम्हाबरोबर नाते जोडावे.



येशू आपणांस वशि्वास करून बाप्तसि्मा घेण्यास्तव आमंत्रति करत आहे. येशू हा मसहिा, देवाचा एकूलता एक पुत्र आहे असा तुम्ही वशि्वास ठेवतिा का? आपण पापी आहात व देवाकडूबन आपणांस होणा-या दंडास पात्र आहात याचा आपण अंगकिार करता काय? येशू ख्रसि्त आपल्या पापांसाठी मरण पावला यावर आपण वशि्वास ठेवता काय?



जर आपण येशूवर वशि्वास ठेवला व त्याच्या कामगरीीवर वशि्वास ठेवला तर आपण ख्रसि्ती आहात! देवाने आपणांस सैतानाच्या अंधःकारमय राज्यातून काढून आपल्या ज्योतरि्मय राज्यामध्ये आणलिे आहे. देवाने आपला जुना पापी स्वभाव काढून आपणाला नवीन स्वभाव दलिा आहे, ज्याच्यायोगे आपण धार्मकि ठरतो.



जर आपण ख्रसि्ती आहात, तर येशू ख्रसि्ताने केलेल्या कामगरीीद्वारे देवाने आपणांस क्षमा केली आहे. आता शत्रुऐवजी देव आपणांस त्याचा जवळचा मति्र असे समजतो.



जर आपण देवाचे मत्रि व प्रभु यसू ख्रस्तिाचे सेवक आहात, तर येशूने दलिेल्या आज्ञेचे पालन आपण स्वेच्छेने करू शकता. जरी आपण ख्रस्तिी आहात, तरी आपण मोहात पडू शकतो. परंतु देव वश्विासू आहे आणि म्हिणतो की जर आपण आपल्या पापांचा अंगकिार केला, तर तो आपणांस क्षमा करील. पापावरिूद्ध लढण्यासाठी तो आम्हास शक्ति देईल.



देव आम्हास प्रार्थना करण्यास, बायबल वाचण्यास, अन्य वश्विासणा-यांसोबत त्याची आराधना करण्यास व त्याने तुम्हासाठी काय केले आहे याची साक्ष देण्यास सांगतो. ह्या सर्व गोष्टी आपणांस देवाबरोबर सखोल सहभागति राखण्यास मदत करतात.

बायबल कथा: रोम ३:२१-२६; ५:१-११; योहान ३:१६; मार्क १६:१६; कलसै १:१३-१४; २ करथि ५:१७-२१; योहान १:५-१०

# 50. येशूचे पुनरागमन



सुमारे २००० वर्षांपासून अधकि आणि अधकि लोक येशूच्या सुवार्तेविषियी ऐकत आलेले आहेत. मंडळीची वाढ होत चालली आहे. येशूने आश्वासन दलि की तो युगाच्या शेवटी पुन्हा पृथ्वीवर येणार आहे. जरी तो अद्याप आला नाही, तरी तो आपले वचन पाळल्यावाचून राहणार नाही.



आपण येशूच्या येण्याची वाट पहात असतांना देवाची अशी इच्छा आहे की आपण त्याच्या गौरवार्थ पवित्र जीवन जगावे. आपण त्याच्या राज्याची सुवार्ता गाजवावी अशीही त्याची इच्छा आहे. येशू ह्या पृथ्वीवर असतांना म्हणाला, “माझे शष्यि देवाच्या राज्य.ची सुवार्ता संपुर्ण जगामध्ये गाजवतील, तेव्हा अंत होईल.”



अनेक लोकगटांनी अजून येशूविषियी ऐकलेले नाही. स्वर्गारोहण होण्यापूर्वी येशूने ख्रिस्ती विश्वासणा-यांना देवराज्याची सुवार्ता सांगण्याची आज्ञा दिली होती. तो म्हणाला, “जा आणि संपूर्ण सृष्टिला सुवार्तेची घोषणा करा!” आणि, “शेत हंगामासाठी तयार आहे!”



येशूने हेही सांगितिले, “एक सेवक आपल्या स्वामीपेक्षा थोर नसतो. जसे मला ह्या जगातील अधिका-यांनी छळले आहे तसेच ते तुमचाही छळ करतील व माझ्या नावासाठी तुमचा द्वेष करतील. जरी तुम्हास ह्या जगामध्ये त्रास व संकटे आहेत तरी धाडस बांधा, कारण मी ह्या जगावर व सैतानावर विजिय मिळिविला आहे. जर तुम्ही शेवटपर्यंत विश्वासू राहलिात, तर देव तुमचे तारण करील!”



युगाच्या समाप्तच्यिा समयी जगातील लोकांचे काय होईल हे समजवण्यिासाठी येशूने एक दाखला सांगतिला. तो म्हणाला, "एका मनुष्याने आपल्या शेतात एक उत्तम बीज पेरलि. मग तो झोपेत असतांना त्याच्या शत्रुने येऊन त्यामध्ये नदिन पेरलि आणि तो नघिून गेला.



जेव्हा त्या बजिास अंकुर फुटू लागले, त्या धन्याच्या सेवकाने म्हटले, 'स्वामी, आपण शेतामध्ये उत्तम बीज पेरलि होते. पण आता त्यात नदिण कोठून आले?' स्वामीने उत्तर दलि, 'शत्रुने त्याची लागवड केली असली पाहजि.'



सेवकाने आपल्या धन्यास म्हटले, ‘आम्ही नदिन उपटून टाकू का?’ धनी म्हणाला, ‘नाही.’ जर आपण असे केले तर आपण कदाचति त्याजबरोबर गहूही उपटून टाकाल. हंगामापर्यंत वाट बघा आणि मिग नदिन जाळून टाकण्यासाठी पेंढ्या बांधून ठेवा; परंतु गहू माझ्या भांडारामध्ये साठवून ठेवा."



शष्यिांना ही गोष्ट समजली नाही, म्हणून त्यांनी त्यास समजावून सांगण्यास वनिंती केली. येशू म्हणाला, “ज्याने उत्तम बीज पेरलि, तो मसहि आहे. शेत ह्या जगाचे प्रतनिधित्वि करते. उत्तम बीच म्हणजे देवाच्या राज्यातील लोक.”



“नदिण म्हणजे सैतानाचे प्रतनिधित्वि करणारे लोक. ज्या शत्रूने नदिण पेरलिे, तो शत्रू म्हणजेच सैतान. हंगाम म्हणजे जगाचा शेवट आणि कापणी करणारे म्हणजे देवाचे दूत.”



“जेव्हा जगाचा शेवट होईल, तेव्हा देवदूत सैतानाच्या अधनि असलेल्या सर्व लोकांस न वझिणा-या अग्नमिध्ये झोकून देईल, तेथे रडणे व दातखाणे चालेल. तेव्हा आपल्या पत्याच्या राज्यात धार्मकि सूर्याप्रमाणे चमकतील.”



येशूने हेही सांगितले की जगाच्या शेवटापूर्वी तो या जगामध्ये परत येईल. जसा तो स्वर्गात घेतला गेला, तसाच तो येईल, अर्थात त्याला एक शरीर असेल व तो मेघारूढ होऊन येईल. जेव्हा येशू परत येईल, तेव्हा ख्रिस्तात मेलेला प्रत्येक जण मरणातून उठेल व अंतराळामध्ये येशूला भेटेल.



तेव्हा जिवंत असलेले ख्रिस्ती विश्वासणारे मेलेल्यांतून उठलेल्या ख्रिस्ती बांधवांस भेटण्यासाठी सामोरे जातील. तेथे ते येशूला भेटतील व त्याजबरोबर राहतील. त्यानंतर येशू आपल्या लोकांबरोबर सिद्ध एकतेमध्ये शांतीने सर्वकाळ राहील.



येशूने आपणावर विश्वास ठेवणा-या प्रत्येकास एक मुकुट देण्याचे आश्वासन दिले आहे. ते त्या ठिकाणी पूर्ण शांतीने देवाच्या सहवासात सर्वकाळ राहतील.



परंतु येशूवर विश्वास न ठेवणा-या प्रत्येकाचा देव न्याय करील. तो त्यांना नरकात टाकील, ज्या ठिकाणी सर्वकाळ रडणे व दातखाणे चालेल व वेदना होतील. त्यांना न विझणा-या अग्नीमध्ये जाळून टाकण्यात येईल व किडे त्यांना सर्वकाळ खात राहतील.



येशू परतल्यावर तो सैतान व त्याच्या राज्याचा समूळ नायनाट करील. तो सैतानाला नरकात टाकील, ज्या ठकिाणी तो सर्वकाळ जळत राहील, त्याजबरोबर त्याला साथ देणारेही असतील.



आदाम आणि हिव्वेने देवाच्या आज्ञेचे उल्लंघन केल्यामुळे पाप ह्या जगात आले व देवाने त्याचा नाश करण्याचा नर्णिय घेतला. परंतु एके दविशी देव परपूिर्ण असे नवे आकाश व नवी पृथ्वी बनवणिार आहे.



येशू आणइ त्याचे अनुयायी नवीन पृथ्वीवर राहतील व ते तजिवर सर्वकाळ राज्य करतील. तो त्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील व त्या ठकिाणी कुठलाही त्रास, नरिाशा, रडणे, पाप, दु:ख कविा मृत्यु नसेल. येशू आपल्या राज्यामध्ये न्यायाने व नीतनि राज्य करील व तो आपल्या प्रजेबरोबर सर्वकाळ राहील.

बायबल कथा: मत्तय २४:१४; २८:१८; योहान १५:२०,१६:३३; प्रकटीकरण २:१०; मत्तय १३:२४–३०,३६–४२; १ थेस्सल ४:१३–५:११; याकोब १:१२; मत्तय २२:१३; प्रकटीकरण २०:१०,२१:१–२२:२१

# Get Involved!

We want to make this visual mini-Bible available in*every language of the world* and you can help! This is not impossible—we think it can happen if the whole body of Christ works together to translate & distribute this resource.

# Share Freely

Give as many copies of this book away as you want, without restriction. All digital versions are free online, and because of the open license we are using, you can even republish Open Bible Stories commercially anywhere in the world without paying royalties! Find out more at (http://openbiblestories.com.)

# Extend!

Get Open Bible Stories as videos and mobile phone applications in other languages at (http://openbiblestories.com.) On the website, you can also get help translating Open Bible Stories into*your* language.